JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459



RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

Volume - 73 | Issue- 63 | Marathi Daily | Wednesday 30/10/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3




सोनेतारण कर्ज
१० ग्रॅमसाठी १२%
रु. ५०,०००/-*
फक्त १० मिनिटात
मुदतठेव १३ महिने १०% | वाहन कर्ज योजना १५% | दामदुप्पट ठेव योजना ९० महिने
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.



अग्रलेख: राज्यात जातकारण तेजीत... पान २



आजी-आजोबांसह बालमित्रांनी लुटला बालगीतांचा आनंद पान ५



स्केटिंग ॲकॅडमीच्या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन पान ६


## उठाठेव

– विवेक मेहेत्रे




भ्रष्टाचार व घोटाळे यावर सध्या एवढं काही छापून येतंय... त्याच विषयावर निराळा दिवाळी अंक का काढताय?

### शेवटच्या दिवशी उमेदवारी दाखल करण्यासाठी भाऊगर्दी

# जिल्ह्यात १२ मतदारसंघात २८८ उमेदवारांचे ४१५ अर्ज

**समाचार/नगर-दि.३०**

जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघासाठी २८८ जणांनी ४१५ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यात सर्वाधिक श्रीगोंदा आणि पाथर्डी-शेवगाव मतदारसंघात प्रत्येकी ३६ जणांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीत बंडखोरी झाली आहे. तसेच अपक्षांच्या उमेदवारी अर्जात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दि. ४ नोव्हेंबरअखेर माघारीसाठी मुदत असून प्रमुख उमेदवारांना बंडखोरांची मनधरणी करण्यात कसरत करावी लागणार आहे.




अकोले मतदारसंघात १३, संगमनेरमध्ये १६, शिर्डीत १५, कोपरगावमध्ये १९, श्रीरामपूरमध्ये ३१, कर्जत- जामखेडमध्ये २३, नेवाशात २४, पाथर्डी-शेवगावमध्ये ३६, राहुरीत २७, पारनेरमध्ये २१, नगर शहरात २७ आणि श्रीगोंदा मतदारसंघात ३६ जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. श्रीगोंदा, कर्जत- जामखेड, नगर शहरात महाविकास आघाडीत आणि श्रीरामपूर, नेवासा, अकोलेत महायुतीत बिघाडी झाली आहे. श्रीरामपूरमध्ये शिवसेनेचा (शिंदे गट) भाऊसाहेब कांबळे आणि राष्ट्रवादीचा (अजित पवार गट) लहु कानडे यांना एबी फॉर्म देण्यात आला आहे. नेवाशात शिवसेनेचे (शिंदे गट) विठ्ठलराव लंघे यांना तर राष्ट्रवादीने (अजित पवार गट) अब्दुल शेख यांना उमेदवादी दिली आहे.

अकोलेमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून किरण लहामटे यांनी अर्ज दाखल केला आहे. येथे भाजपाचे वैभव पिचड यांनी अर्ज भरल्याने महायुतीतील बंडखोरी समोर आली आहे. श्रीगोंद्यात ठाकरे गटाकडून अनुराधा नागवडे यांनी अर्ज भरला आहे. या मतदारसंघात राहुल जगताप यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत बंडखोरी झाली आहे. शिर्डीत भाजपाकडून राधाकृष्ण विखे यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. या मतदारसंघात डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी अपक्ष अर्ज भरला आहे. नगर शहरात शरद पवार गटाकडून माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी अर्ज दाखल केला आहे. ठाकरे गटाचे प्रा. शशिकांत गाडे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, काँग्रेसचे किरण काळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. भाजपाचे वसंत लोढा यांनी भाजपा आणि अपक्ष असे दोन अर्ज भरले आहेत.

# गावठी कट्टा बाळगणारा पकडला

**समाचार/नगर-दि.३०**



गावठी कट्टा बाळगणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेने पकडले. श्रीरामपूर शहरात ही कारवाई करण्यात आली.पोनि दिनेश आहेर यांना माहिती मिळाली की, एक इसम बेकायदेशीरपणे गावठी कट्टा बाळगत असून तो दत्तनगर (श्रीरामपूर) येथे आहे. पोनि आहेर यांनी पोलीस अंमलदार मनोज गोसावी, ज्ञानेश्वर शिंदे, फुरकान शेख, सोमनाथ झांबरे, प्रशांत राठोड, रमीजराजा आत्तार व महादेव भांड अशांचे पथक तयार करून संशयिताची माहिती घेऊन त्यास ताब्यात घेण्याची सूचना केली. पथकाने सुतगिरणी फाटा, रेल्वे फाटकजवळ येथे संशयीत इसमाचा शोध घेऊन, त्यास ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव इम्तीयाज उर्फ बबलू अजीज शहा (वय ३२, रा.काझीबाबा रोड, वॉर्ड नं.२, श्रीरामपूर) असे असल्याचे सांगितले.त्याच्या अंगझडतीत ३० हजार रुपये किंमतीचा एक गावठी बनावटीचा कट्टा व १ हजार रुपये किंमतीचे २ काडतुसे असा एकुण ३१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

## निवडक

### बंडखोरी रोखण्यासाठी बैठकांचे सत्र



**मुंबई, दि.३०-** विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत पाहायला मिळत आहे. राज्यातील २८८ मतदारसंघांसाठी एकूण ७ हजार ९९५ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीत अनेक ठिकाणी बंडखोरी पाहायला मिळत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत जाहीर करण्यात आलेल्या उमेदवार याद्यानंतर काही मतदारसंघांमध्ये पक्षांतर्गत नाराजी समोर आली आहे. त्यामुळे काहींनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीतील नेत्यांची दिवाळी बंडखोरांचे बंड रोखण्यातच जाणार असल्याचे बोलले जात आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये काल बऱ्याच बंडखोरांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे आता हे बंड कसे शमवायचे, याचे राज्यातील सर्वच मोठ्या नेत्यांना टेन्शन आले आहे. त्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीत बैठकांचे सत्र सुरू झाले आहे.

## बंद पडलेल्या कंपनीतून १३ लाखाच्या साहित्याची चोरी

**समाचार/नगर-दि.३०**

नागापूर एमआयडीसीतील एका बंद पडलेल्या कंपनीतून अज्ञात चोरट्यांनी एकुण १३ लाख ९३ हजार ५० रूपये किंमतीचे साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे. कंपनीचे मालक वल्लभ बिहारीलाल भराडोया (वय ४७, रा. गंज बाजार, नगर) यांनी फिर्याद दिली आहे. भराडोया यांची नागापूर एमआयडीसीत डी ६६ येथे कंपनी आहे. सदरची कंपनी सध्या बंद पडलेली आहे. मात्र त्यात साहित्य तसेच आहे. त्यांनी ६ ऑक्टोबर २०२४ रोजी कंपनीत जावून पाहिले असता सर्व साहित्य जागेवरच होते. त्यानंतर ते २७ ऑक्टोबर रोजी कंपनीत गेले असता, त्यांना कंपनीतील साहित्य चोरीला गेल्याचे लक्षात आले. यामध्ये ५ लाख २० हजाराचे पितळी कॉक व त्याचे पितळी निप्पल, ४ लाख ८२ हजार ६०० रूपूयांचे पाईप, रींग व जाळी, ३ लाख १६ हजार ३५० रूपयांचे बर्नर, चेकनट व बेकेट, ६१ हजार ७५० रूपये किमतीचे बार रॉड व १२ हजार ३५० रूपये किमतीचे होज निप्पल असा एकुण १३ लाख ९३ हजार ५० रूपये किंमतीचा ऐवज चोरीला गेल्याचे भराडोया यांच्या लक्षात आले. त्यांनी सदरची घटना एमआयडीसी पोलिसांना सांगितली व फिर्याद दाखल केली. दरम्यान, घटनास्थळी नगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक संपत भोसले, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, उपनिरीक्षक परदेशी, उपनिरीक्षक जाधव यांनी भेट दिली आहे. अधिक तपास उपनिरीक्षक परदेशी करत आहेत.

## पत्रकार चौकात घरफोडी; ४८ हजाराचा ऐवज लंपास

**समाचार/नगर-दि.३०**

जिल्हा शासकीय रूग्णालयात वरीष्ठ लिपीक पदावर कार्यरत असलेले योगेश ज्ञानदेव दिवटे (वय ३७, रा. डॉक्टर वसाहत, जिल्हा रूग्णालय, पत्रकार चौक) यांचे घर फोडून चोरट्यांनी सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल असा ४८ हजारांचा ऐवज चोरून नेला.

२८ ऑक्टोबर रोजी दुपारी चार ते सायंकाळी सव्वा पाचच्या दरम्यान ही घटना घडली.या प्रकरणी दिवटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या पत्नी परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी सोमवारी दुपारी चार वाजता दिल्लीगेट येथे गेल्या होत्या. त्या सायंकाळी सव्वा पाच वाजता घरी आल्या असता, त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले. कपाटातील सामानाची उचकापाचक केलेली व त्यातील साहित्य कपाटाबाहेर अस्तव्यस्त पडलेले दिसले. घरात चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. चोरट्यांनी त्यांच्या घरातून २५ हजाराची रोकड दोन तोळ्याचे सोन्याचे मिनी गंठण, दोन ग्रॅमच्या सोन्याच्या गुंफलेल्या पळ्या, एक मोबाईल असा ४८ हजार रूपये किंमतीच्या ऐवज चोरून नेला आहे.


|| श्री ||
दिवाळी फराळ
५१ वर्षांची परंपरा जपत शुद्ध, पौष्टिक, पारंपारिक व घरगुती पद्धतीने बनविलेले फराळाचे पदार्थ..
सच्चिदानंद केटरर्स
प्रोप्रा. नरेंद्र कुलकर्णी
9822771199, 9420796195
शमी गणपती मंगल कार्यालय, दिल्लीगेट, अ.नगर


### विधानसभेला उदंड झाले इच्छुक; मैदान न सोडण्याचा बांधला चंग!

# महायुती, आघाडीत बंडखोरीचे ग्रहण सुटणार कसे?

**नंदकुमार सातपुते**

**समाचार/नगर-दि.३०-** विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या कालच्या शेवटच्या दिवशी नगर जिल्ह्यात पक्षीय उमेदवारी न मिळालेल्या इच्छुकांच्या बंडखोरीचे अमाप पीक दिसून आले. सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडीला अनेक मतदारसंघात बंडखोरीचे ग्रहण लागले. यातील काही दिग्गज इच्छुकांनी तर ही निवडणूक प्रतिष्ठेची करीत माघार न घेण्याचेही ठरवून टाकले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत पक्षश्रेष्ठींनी मनधरणी करूनही या इच्छुकांनी माघार घेतली नाही तर जिल्ह्यात विधानसभेला बहुरंगी लढती अटळ आहेत. येत्या २० नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात अनेक मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीची उमेदवारी न मिळालेल्या अन्य इच्छुकांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करीत बंडाचे निशाण फडकावले आहे. राज्याच्या राजकारणात महत्वाची भूमिका असणारा नगर जिल्हाही त्यास अपवाद राहिलेला नाही. नगर जिल्ह्यातील



१२ पैकी बहुतांश मतदारसंघात महायुती आणि आघाडीच्या अधिकृत उमेदवारांविरोधात अन्य प्रमुख इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दाखल करून दोन्ही बाजूंच्या पक्षश्रेष्ठींची डोकेदुखी वाढविली आहे. नगर शहरासह श्रीगोंदा, पारनेर कर्जत-जामखेड, शेवगाव-पाथर्डी, नेवासा, श्रीरामपूर, अकोले आदि बहुतांश मतदारसंघात ही परिस्थिती आहे. नगर शहर मतदारसंघात महायुती आणि आघाडी या दोन्ही ठिकाणी बंडखोरी झाली. महायुतीत भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य वसंत लोढा यांनी मित्रपक्ष राष्ट्रवादीविरुद्ध बंडखोरी केली आहे तर आघाडीत उद्धवसेना आणि काँग्रेसने शहराची जागा खा. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला गेल्याच्या निषेधार्थ उमेदवारी अर्ज दाखल करीत बंडखोरी केली आहे. शिवसेनेचे दक्षिण जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी तसेच काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांच्याविरुद्ध बंडखोरी केली आहे. शहरात आघाडीची पूर्ण बिघाडी झाल्याचेच वित्र यानिमित्ताने पुढे आले आहे. नगर दक्षिणेचे राष्ट्रवादीचे खासदार नीलेश लंके यांचे होमग्राऊंड असलेल्या पारनेर मतदारसंघातही हीच परिस्थिती आहे. तेथे आघाडीच्या उमेदवार राणीताई लंके यांच्याविरुद्ध शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख संदेश कार्ले यांनी बंडखोरी केली आहे. या मतदारसंघात महायुतीत राष्ट्रवादीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्याविरूद्ध याच पक्षाच्या तिघा प्रमुख इच्छुकांनी बंडाचे निशाण उभारले आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य माधवराव लामखेडे, पारनेरचे माजी नगराध्यक्ष विजय औटी यांनी उमेदवारी दाखल करीत बंड केले आहे. कर्जत-जामखेड मतदारसंघ खा. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसाठी अत्यंत प्रतिष्ठेचा. खा. पवार यांचे नातू आ. रोहित पवार यांना या मतदारसंघात पुन्हा उमेदवारी दिली गेल्याने मित्रपक्ष काँग्रेसच्या इच्छुकांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यातूनच काँग्रेसने याठिकाणी सांगली पॅटर्न राबविण्याचा इशारा दिला. या मतदारसंघात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कैलास शेवाळे यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे तर महायुतीचे दिग्गज उमेदवार आ. प्रा. राम शिंदे यांच्याविरोधात विखे समर्थक ज्येष्ठ नेते अंबादास पिसाळ यांनी बंडखोरी केली आहे. (पान ३ वर)

### काँग्रेसची भूमिका आघाडीत मान्य होणार?

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेंनीथला यांनी या निवडणुकीत आघाडीत कुठेही मैत्रीपूर्ण लढती होणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे. तसेच धोरण आघाडीतील राष्ट्रवादी आणि शिवसेनेनेही घेतल्यास नगर जिल्ह्यातील बंडखोर उमेदवार पक्षश्रेष्ठींच्या आदेशाने आपले दाखल अर्ज मागे घेतील का? याचीही चर्चा यानिमित्ताने आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये होते आहे.


|| ॐ महालक्ष्म्यै नमः || ॐ महालक्ष्म्यै नमः ||
|| ॐ ||

|| ऐं || || ह्रीं || || क्लीं ||
|| स्थूलसूक्ष्ममहारौद्रे महाशक्ती महोदरे ||
|| महापापहरे देवि महालक्ष्मी नमोस्तु ते ||
हे महालक्ष्मी देवी, तूच स्थूल-सूक्ष्माला व्यापून टाकणारी महारौद्ररुपिणी आहेस,
ह्या संपूर्ण विश्र्वाचा सांभाळ करणारी, सर्व पापांचा नाश करणारी तूच महाशक्ती आहेस !
हे महालक्ष्मी, तुला आमचा साष्टांग दंडवत !!
दीपावली निमित्त सर्व भक्तांना हार्दिक शुभेच्छा !
श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग, पुणे
दीपावली निमित्त महालक्ष्मी मातेस सोन्याची साडी परिधान करण्यात येईल.

संपादकीय

# राज्यात जातकारण तेजीत...

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात एकूणच जातीची समिकरणे उभी रहात असून कोणती जात कोणत्या युती किंवा आघाडीच्या जवळ आहे, हे पडताळून राजकीय समिकरणे आखली जात आहेत. त्यातूनच राज्यात निवडणूकपर्व जातकारण आकार घेत आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः जालना जिल्ह्यातील आंतरवाली-सराटी येथे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना भेटायला गेले होते. मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करावा, अशी मागणी करत जरांगे पाटील उपोषणाला बसले होते. हे उपोषण सोडवण्यात शिंदे यांची भूमिका महत्त्वाची होती. राज्य मागासवर्गीय आयोगाच्या माहितीनुसार राज्यात मराठा समाजाची लोकसंख्या २८ टक्क्यांच्या आसपास आहे. मराठा आंदोलन भडकले असताना महायुती सरकारने फेब्रुवारी २०२४ मध्ये या समाजासाठी वेगळे दहा टक्के आरक्षण देऊ केले होते. हा निर्णय मराठा समाजाची मते मिळवण्याकामी साह्यकारक ठरेल, अशी महायुती सरकारची अपेक्षा होती; मात्र लोकसभा निवडणुकीत तसे दिसले नाही. मराठवाड्यातील आठ लोकसभा मतदारसंघांपैकी लातूरचा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव आहे, तर इतर सात मतदारसंघ खुल्या वर्गात आहेत. बीड आणि परभणी या दोन जिल्ह्यांमध्ये मराठा, मुस्लीम आणि दलित या तीन समाजांमध्ये जातीय ध्रुवीकरण झाल्यामुळे महायुतीच्या पंकजा मुंडे आणि महादेव जानकर यांचा पराभव झाला. याच प्रकारे छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेने(एकनाथ शिंदे)चे उमेदवार आणि मराठा समाजाचे नेते संदीपान भुमरे यांचा विजय झाला. त्यांनी ओबीसी नेते चंद्रकांत खैरे यांचा पराभव केला. आताही विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवार उतरवण्याचा निर्धार करताना मनोज जरांगे यांनी 'माधव पॅटर्न' ला 'ममुद' (मराठा, दलित मुस्लीम) पॅटर्नचा पर्याय दिला आहे. माळी, धनगर आणि वंजारी या तीन घटकांची मतदारसंख्या साडेतीन कोटींच्या आसपास असल्याचे सांगितले जाते. हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या सुमारे २५ टक्क्यांच्या आसपास होते. या 'माधव पॅटर्न'ला पर्याय म्हणून जरांगे यांनी आणलेल्या 'ममुद पॅटर्न' च्या मतदारांची संख्या पन्नास टक्क्यांहून थोडी जास्त होईल; परंतु निवडणुकीत 'माधव पॅटर्न' जसा एकवटतो, तसा 'ममुद पॅटर्न' एकवटत नाही. मराठा समाज अनेक पक्षांमध्ये विभागला आहे. दलित आणि मुस्लिमांचेही तसेच आहे. त्यामुळे जरांगे यांचा पॅटर्न यशस्वी होण्याला मर्यादा आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये धनगर समाजाने ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनात मोठी भूमिका बजावली; परंतु या समाजातही दुफळी आहे. आता तर राष्ट्रीय समाज पक्षाच्या महादेव जानकर यांनी महायुतीतून बाहेर पडून विधानसभेच्या शंभराहून अधिक जागा लढवण्याचा निर्णय घेतला आहे. मराठा आंदोलक जरांगे पाटील यांनी काही दिवसांपूर्वीच मराठ्यांना शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले आहे. ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यास विरोध करणाऱ्यांचा पराभव करा, असे आवाहन त्यांनी केले आहे. याबरोबरच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतरची पक्षांची झालेली फेररचनाही आगामी निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावू शकते. राज्यामध्ये सुमारे नव्वद लाख धनगर आहेत. धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती हव्या आहेत. राज्यात आदिवासींची संख्या एक कोटी वीस लाखांच्या आसपास आहे. आदिवासींचा धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती द्यायला विरोध आहे. याच सुमारास केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू राज्यातील बौद्ध दलित समाजाच्या नेत्यांच्या बैठका घेत होते. महाराष्ट्रातील मागासलेल्या आणि दलितांमध्ये आपले स्थान मजबूत आणि विस्तारित करण्याच्या भाजपच्या डावपेचांना या बैठका बळ देतात. पंकजा यांना मराठवाड्यामध्ये भाजपचा ओबीसी चेहरा म्हणून पाहिले जात असताना पक्षाने रिजिजू यांना बौद्ध दलितांमध्ये, विशेषतः विदर्भात मतांची बेगमी करण्यासाठी तैनात केले. राज्यातील एकूण अनुसूचित जातीतील मतदारांपैकी दलित बौद्धांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. या गटाने काँग्रेस किंवा प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीची बाजू घेतली आहे. रिजिजू यांनी शंभरहून अधिक सभा घेतल्या. मराठवाडा हे जसे कृषीप्रधान मराठ्यांचे केंद्र आहे, त्याचप्रमाणे वंचित-ओबीसी मतदारांचाही बालेकिल्ला आहे. राज्यात ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्के आहे. सुमारे वर्षभरापासून सुरू असलेल्या जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनामुळे ओबीसी समाजाला असुरक्षित वाटत आहे. आपल्या आरक्षण कोट्यात इतर कोणी शिरावे, असे त्याला वाटत नाही. गेल्या वर्षभरात मराठा आणि ओबीसी आंदोलनाने अनेक गावांमध्ये, विशेषतः मराठवाड्यात अशी तेढ निर्माण केली आहे की दोन्ही समाजांनी एकमेकांच्या सुख-दु:खात सहभागी होणे सोडून दिले आहे. महाराष्ट्रात यापूर्वी कधीच अशी स्थिती नव्हती. मराठा आणि ओबीसी ध्रुवीकरणाबरोबरच मराठवाड्यातील १५ टक्के मुस्लीम लोकसंख्याही आपला प्रभाव दाखवण्यात कमी पडणार नाही. विशेषत: ओवेसी यांच्या 'एआयएमआयएम'चा या भागात चांगला प्रभाव आहे. मुस्लीम मतदारांप्रमाणेच मराठवाड्यात वंचितांचीही मोठी लोकसंख्या आहे. सध्या भाजपच्या गटात असलेले केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि बहुजन विकास आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यात दलित मतांची विभागणी होणार आहे. राणे समितीच्या शिफारशीनंतर मुस्लिमांनाही पाच टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला होता. त्याला स्थगिती नसतानाही अंमलबजावणी झाली नाही. राज्य सरकारने आता प्रत्येक समाजघटकासाठी एक महामंडळ काढून एक प्रकारे जातीय अस्मितेला नवी ओळख दिली आहे. विकासाच्या मुद्याऐवजी टोकदार जातीय अस्मितेच्या मुद्यावर विधानसभेची निवडणूक होत आहे. त्याला 'लव जिहाद', 'लँड जिहाद'ची फोडणी आहे. या रणधुमाळीत कोणत्या जातसमुहाचे वजन कोणाच्या पारड्यात किती प्रमाणात पडते यावर बरेच काही अवलंबून असणार आहे

# हिवरे बाजारच्या भेटीतून प्रेरणा- डॉ. चंद्र



**समाचार/नगर-दि.३०**

हिवरे बाजार भेटीतून जीवनाला प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन डॉ. शिशिर चंद्र यांनी केले.

हिवरे बाजार भेटीतून नवी प्रेरणा मिळाली आत्ता पर्यत हिवरे बाजारच्या कामाचे व्हिडीओ ऑडीओ पेपर माध्यमातून खूप वेळा वाचले पण प्रत्यक्ष भेट दिली नव्हती देशभरात अनेक ठिकाणी पोपटराव जी चे व्यख्यान ही ऐकले परंतु आज प्रत्यक्ष हिवरे बाजार पहिल्या वर ऐकणे व प्रत्यक्ष भेटीतून पाहणे यात जमिन आस्मानाचा फरक असतो आणि पाहणातून खूप काही वेगळ पहायला मिळले हिवरे बाजारचे काम हे राष्ट्र निर्मन चे काम असून नव्या पिढीला यातून मोठी प्रेरणा मिळते. अजीम प्रेमजी फाउंडेशनच्या माधमातून भारत भर आम्ही काम करतो त्या कामाला एक स्वावलंबी गाव कस कराव यातून प्रेरणा मिळते. सर्वांगी सुंदर हिवरे बाजारला आल्या नंतर प्रत्यक्ष पाहायला मिळाले. म्हणून नाम फाउंडेशन माध्यमातून काम आता भारतभर जात आहे आणि त्याच्या मागे हि हिवरे बाजारची प्रेरणा आहे. ही आनंदाची गोष्ट आहे व हिवरे बाजार आता स्व:त साठी नाही तर पर्यवरण ,पाणी ,ग्राम विकास व कृषी भारतभर सर्व क्षेत्रात प्रेरणा स्थान झाले आहे, असे ते म्हणाले.

# कामगार सेवा संस्थेचे अनिल आंधळे अध्यक्ष



**समाचार/नगर-दि.३१**

कामरगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदी मेजर अनिल आंधळे तर उपाध्यक्षपदी रमेश साठे यांची निवड झाली.

कामरगाव येथे विविध कार्यकारी सोसायटीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत संचालक विष्णू कातोरे, रावसाहेब आंधळे, सुदाम ठोकळ, अध्यक्ष सुनिल चौधरी, उपाध्यक्ष राजेंद्र राजगुरु, नगर तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालिका मंगल ठोकळ, प्रा.अशोक ठोकळ, माजी चेअरमन शिवाजी साठे, स्विकृत संचालक गोरख ठोकळ तसेच लक्ष्मण ठोकळ मित्र मंडळाचे गोरख मामा साठे, भाऊसाहेब दळवी, बापूसाहेब शेळके, राम नानेकर, गोरख खोडदे, शशिकांत ठोकळ, आजी माजी सघटनेचे अध्यक्ष प्रकाश ठोकळ व त्यांचे सहकारी. सांगळे बंधू, खोडदे, ज्येष्ठ मार्गदर्शक लक्ष्मण शेळके, भानुदास ठोकळ, शंकर ठोकळ, एकनाथ ठोकळ शामराव आंधळे आदी उपस्थित होते.

खरेदी विक्री संघाचे संचालक लक्ष्मण ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली कामरगाव विविध कार्यकारी सोसायटीचे काम जिल्ह्यात एक नंबर करण्यासाठी प्रयत्न करु. असे अध्यक्ष आंधळे आणि उपाध्यक्ष साठे यांनी सांगितले आहे.

# दीपावली मनाएं...

आपल्याला उगीचच सवय असते. यंदा फार उन्हाळा कडक आहे किंवा थंडी जास्त आहे वगैरे वगैरे. पण ही बोलायची पध्दत. याच चालीवर यंदा दिवाळीत फार महागाई वाढलीय असं म्हणणारे आहेतच. पण दाढी आणि महागाई या वाढणाऱ्याच गोष्टी सदैव वाढणारच! त्याचा दिवाळीवर फारसा फरक पडत नसतो.

बाजारात नुसती चक्कर टाका. दुकाने आणि रस्ते हे तुडूंब भरलेले... काही म्हणा.. पण दिवाळीचा उत्साह आनंद सर्वत्र झळकत असतो. अगदी रस्त्यावर पणत्या, लक्ष्मी, रांगोळी स्टीकर वगैरे घेऊन बसणाऱ्यांपासून कोहिनूर, राजवस्त्र पेशवाई सारख्या बड्या आलिशान दुकानात 'लक्ष्मी' खेळत असते.

डिस्काऊंट हा शब्द कुणालाही आकर्षित करणारा. १० टक्के पासून ५० टक्केपर्यंत सूट. दोनावर एक फ्री, दोन हजाराची साडी ८०० त... वगैरे वगैरे वाचून ग्राहकांची झुंबड उडते. वास्तविक पाहता दोन हजार किंमत ठरवणारे तेच आणि आठशे ठरवणारेही तेच सगळा मानसिक खेळ. पण हा विचार सहसा कुणाच्या मनात येत नसतो. डिस्काऊंटमध्ये फायदा (!) झाला याचा आनंद असतो. (वास्तविक फायदा दुकानदारांचा!)

मोठ्या वस्तू म्हणजे इलेक्ट्रॉनिक स्कूटर, कार घेण्याकडे जरा कल यंदा जास्त वाटतोय. दिवाळीत हार घालून सजवलेली नवी वाहने या वर्षी खूप दिसतील. कालानुरुप फ्रिज, टीव्ही वगैरे वस्तू आता दिवाळीलाच किंवा मुहूर्तालाच खरेदी करायच्या हा ट्रेंडही जरासा बदललाय.

अलिकडे एक्स्चेंज ऑफर हा प्रकारही वाढलाय. कुसुमाग्रज आज असते तर 'जुने जाऊ द्या मरणा लागुनी' ऐवजी 'जुने जाऊ द्या घराघरा मधुनी, एक्स्चेंजमध्ये देवून टाका' असं म्हणाले असते. असो! हल्ली लोन पे फोन, तसेच चप्पल बुटापासून कारपर्यंत सारं काही लोन पे मिळतं. (लोन पे शूज-हा बोर्ड बालिकाश्रम रस्त्यावर दिसतो.)

हे सारं पाहताना आमच्या पिढीचा कालखंड आठवतो. अहो दिवाळीच्या मुहुर्तावर रेडिओ, ट्रान्झिस्टर विकत घेणं हे एक स्वप्न असायचं. आई वडिलांना प्रपंचाचा मोठा गाडा हाकलताना असली चैन कधी परवडणार? पण समजा एखाद्या घरी रेडिओ किंवा नवी सायकल आली तर सारी गल्ली पहायला यायची. कोणतीही नवी वस्तू आणली की आजूबाजूच्या घरात कौतुकाने दाखवण्याची पध्दत होती. टीव्ही पहिल्यांदा आला की छोटे मोठे सर्वजण मांडी घालून बसत. शेजाऱ्यापाजाऱ्यांनाही निमंत्रण. त्यामुळे शो हाऊसफुल्ल. खरं सांगतो आज ४८ इंची टीव्ही पाहताना देखील ते दिवस अधिक आनंदाचे वाटतात. B&W टीव्हीचा सामुदायिक पाहण्याची मजाच वेगळी होती.

दिवाळी म्हटलं की सर्वप्रथम पोरासोरांना नवे कपडे, हल्ली मम्मी, डॅडी मोठ्या हौसेने आपल्या Kids ना छान छान महागडे कपडे घेताना पाहून मन कसं भरुन यंते. आमच्या काळात कपडे ही चैन नव्हती. रेडिमेड दुकान मदुरा किंवा जरीवाला सारखे मोजके. कपडे घेताना आमचा बाप वाढत्या मापाचे कपडे (सदरा, चड्डी) घ्यायचे. माप कधी कधी एवढं वाढत असायचं की चड्डी घातल्यानंतर धरुनच चालावं लागायचं किंवा मग घसरु नये म्हणून त्यावर करगोटा गुंडाळायचा. रेडिमेड कपडे शक्य नसतील तर मग हरक किंवा मांजरपाटाचं कापड आणून त्याचे सदरे. टेलर आधी दोन दिवस कापड भिजवून ठेवायचा व नंतर असे नमुनेदार कपडे शिवायचा की देखते रहो.

दिवाळीच्या आधी घराला रंग. पूर्वी मातीची घरे होती ती आतून शेणाने सारवायची व बाहेरुन चुना. चुन्याची खडी आधी दोन तीन दिवस पाण्यात बादलीत टाकून ठेवायची. तो रटरट शिजल्या सारखा उडायचा. रंग देताना हाताला छिद्रे पडू नयेत म्हणून थोडं तेल लावायचं आणि केरसुणी किंवा पोतेऱ्याने तो चुना लिंपायचा. नंतर डिस्टेंपर वगैरे प्रकार आले. तरी देखील रंगकाम शक्यतो घरीच.

त्याकाळी फराळाचे पदार्थ घरोघरी बनले जायचे. लहान मुले असो की मोठे, गल्लीतील एखाद्या घरातून किंवा शेजाऱ्याच्या घरातून खमंग वास आला की थेट स्वयंपाक गृहात जाण्यात कधी संकोच वाटत नसे. दिवाळीच्या फराळाच्या ताटाची देवाण घेवाण होत असे. पदार्थ तेच असले तरी प्रत्येकाच्या हातची चव वेगळी. फराळाचं ताट शेजाऱ्यांना देणं हे प्रेमाचं प्रतिक होतं. आता भागदौडच्या लाईफमध्ये अनेक लोक तयार फराळाचं विकत आणतात. पण त्याला आपल्या आईच्या, आजीच्या किंवा पत्नीच्या हातची चव थोडीच येणार! ते पदार्थ करताना त्यात त्यांच्या प्रेमाची चव उतरलेली असते. लेकिन चलता है...जमाने के साथ सबकुछ बदलता है. फराळाचे पदार्थ करताना एक सुगंधीत, खमंग वातावरण निर्मिती होत असते. तो गंध शब्दापलिकडचा.

**- एजी. नगरवाला.**



## राशीभविष्य

- **मेष** : घाईने कोणतेही निर्णय घेऊ नयेत. उत्साहवर्धक घटना घडतील. आप्त भेटल्याने समाधान लाभेल.
- **वृषभ** : कौटुंबिक जीवनात शुभघटना घडतील. संततीच्या विद्याभ्यासाकडे लक्ष द्यावं. प्रकृती सांभाळावी.
- **मिथुन** : कामाची दगदग वाढणार आहे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. मित्रांचं चांगलं सहकार्य लाभेल.
- **कर्क** : नव्या कामांना गती मिळेल. भावंडांशी सामंजस्यानं रहावं. संसर्गजन्य आजारापासून सावध रहावं.
- **सिंह** : नव्या वाहनांची खरेदी करू शकाल. गृहसौख्य लाभेल. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल.
- **कन्या** : व्यवसायात अडचणी राहतील. मार्गही निघत जाईल. फार दगदग करू नका. स्वमताग्रह टाळावा.
- **तूळ** : यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. व्यवसायात बदल लाभदायक ठरतील. बाकी चिंता नको.
- **वृश्चिक** : प्रवास शक्यतो टाळावा. बोलण्यातून गैरसमज संभवतात. नोकरीत ताण-तणाव वाढीस लागतील.
- **धनु** : ओळखींपासून लाभ होईल. कर्ज प्रकरणात महत्त्वाचा दिलासा मिळेल. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **मकर** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. नव्या योजना मार्गी लागतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **कुंभ** : अपेक्षित ध्येयपूर्तीचं समाधान लाभेल. प्रक्रिया उद्योगात उत्कर्ष होईल. अनावश्यक ताण टाळावा.
- **मीन** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे होतील. सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घ्याल. प्रियजनांचा सहवास लाभेल

## दिनविशेष

### ३१ ऑक्टोबर

- **१८९५** : क्रिकेटपटू सी. के. नायडू यांचा जन्म.
- **१९७५** : ख्यातनाम संगीतकार सचिन देव बर्मन यांचं निधन.
- **१९८४** : पंतप्रधान इंदिरा गांधी यांची अंगरक्षकांकडून गोळ्या झाडून हत्या.
- **१९८६** : बालसाहित्यिका आनंदीबाई शिर्के यांचं निधन.
- **१९९९** : ज्येष्ठ चित्रकार डॉ. भय्यासाहेब ओंकार यांचं निधन.
- **२००५** : पंजाबी लेखिका आणि कवयित्री अमृता प्रीतम यांचं निधन.

## आरोग्यमंत्र

### दंतसमस्यांविषयी...

शरीराला अनेक पोषणमूल्यांची आवश्यकता असते, त्यातील एक म्हणजे प्रोटीन. प्रोटीनअभावी दातांच्या आणि हिरड्यांच्या आरोग्याचं मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊ शकतं खेरीज दात किडण्याचा धोकाही वाढतो. चिकन किंवा अंडी यासारखे पदार्थ प्रोटीनचे समृद्ध स्त्रोत मानले जातात. प्रति दिन १००० मिलिग्राम प्रोटीन आणि व्हिटॅमिन्सच्या सेवनाने हिरड्यांच्या समस्यांपासून लांब राहता येतं. प्रोटीनच्या कमतरतेमुळे होणारे दातांचे काही आजार पुढीलप्रमाणे-



जिंजिवायटीस- या आजारामध्ये हिरड्या लाल होणं, हिरड्यांची मुळं कमकुवत होणं ही लक्षणं दिसून येतात. काही वेळा दातांमध्ये त्रिकोणी भाग तयार होतो ज्यामुळे वेदनांना सामोरं जावं लागतं. पांढऱ्या कोशिकांचं विशिष्ट ठिकाणी झालेलं एकत्रीकरण हे देखील जिंजिवायटीसचं कारण असू शकतं. जिंजिवायटीसवर योग्य वेळी उपचार केले गेले नाहीत तर पेरोडोंटायटीसचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता वाढते. पायोरिया- पायोरिया हा हिरड्यांशी संबंधित आजार आहे. ब्रश करताना किंवा काहीही खाताना हिरड्यातून रक्त येणं हे पायोरियाचं लक्षण समजलं जातं. पेरीओडोंटायटीस- या आजारामध्ये आतील आवरणावर परिणाम होऊन दात सुट्टे व्हायला लागतात. सुट्या झालेल्या दातांमध्ये कीड वाढीस लागून ते मुळापासून विलग होऊन पडू लागतात. योग्य आहार आणि वेळोवेळी केली जाणारी स्वच्छता दातांचं आरोग्य उत्तम ठेवण्यास उपकारक सिद्ध होते.

## महत्त्वपूर्ण काही...

### मंगळाच्या अंतरंगात...

आकाशगंगेतील ग्रह-ताऱ्यांच्या अभ्यासासाठी विविध उपकरणांची मदत होत असते. मंगळावर पाठवण्यात आलेल्या यानातही अशाच काही महत्त्वपूर्ण उपकरणांचा समावेश होता. त्यातील एक म्हणजे इलेक्ट्रॉन रिफ्लेक्टोमीटर. मंगळाच्या चुंबकीय क्षेत्राचा अभ्यास आणि सौरवायुचा यावर काय परिणाम होतो त्याचा अभ्यास करण्यासाठी या उपकरणाचा उपयोग झाला. हे अत्यंत संवेदनशील उपरकण होतं. मंगळ मोहिमेच्या अंती प्रकाशित झालेल्या निष्कर्षांमधील प्रमुख मुद्दे असे होते की, मंगळाच्या पृष्ठभागवर अनेक पापुद्र्यांचे थर आहेत ज्यांची जाडी सुमारे १० कि.मी. इतकी आहे. मंगळाच्या दोन्ही गोलार्धांवर समान प्रमाणात विवरं आहेत जी वाळूखाली गाडलेल्या अवस्थेत आहेत तर काही विवरं वर आली आहेत. मंगळावर अनेकदा वादळ येतात. मंगळावर अनेक ठिकाणी वाहून गेलेल्या पाण्याची स्पष्ट चिन्हं दिसली आहेत. मंगळाच्या पृष्ठभागावर हेमेटाइट हे खनीज सापडलं होतं. हेमेटाइट हे लोह आणि प्राणवायूचे संयुग आहे याला आपण गंज म्हणूनही ओळखतो.

## सल्ला मोलाचा

### ड्रेप साडी लाईक धिस

मैत्रिणींनो, दिवाळीनंतर लग्नसराईला सुरूवात होईल. साखरपुड्यापासून रिसेप्शनपर्यंत लग्नाच्या प्रत्येक समारंभात काही तरी हटके करायला हवं. विवाह सोहळ्यात पारंपरिक नऊवारी किंवा जरीबुट्टीची साडी नेसायची असली तरी इतर कार्यक्रमांना थोडं फॅशनेबल दिसायला काय हरकत आहे? ✻ डिझायनर ब्लाउज थोडा बाजूला ठेवा. साडीसोबत क्रॉप टॉप ट्राय करा. तुम्हाला क्रॉप टॉप्सची भरपूर व्हरायटी पहायला मिळेल. पोलका डॉट्सपासून अगदी गडद रंगांचे टॉप्स तुम्ही निवडू शकता. ✻ साडीच्या आत परकरऐवजी धोती पँट किंवा चुडीदार घालून बघा. धोती पँटमध्ये फारसं आरामदायी वाटत नसेल तर चुडीदार घालता येईल. साडीला काँट्रास्ट रंग निवडा. चुडीदारचे वेगळे आकारही ट्राय करता येतील. ✻ साडीसोबत फंकी जॅकेट घालता येईल. जॅकेट घातल्यावर पदर नेहमीप्रमाणे बाहेर सोडता येईल किंवा जॅकेटच्या आतही घालता येईल. ✻ साडीसोबत बेल्ट ट्राय करा. हेवी वर्कवाली साडी घालायची असेल तर बेल्टचा लूक सिंपलच ठेवा. सिंपल साडीसोबत ट्रेंडी बेल्ट चालून जाईल.

## पंचांग

**गुरूवार, ३१ ऑक्टोबर २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
अश्विन कृ. १४, नक्षत्र : चित्रा
चंद्रराशी : कन्या, विष्कंभ योग
सूर्योदय : ६.४१, सूर्यास्त : ०६.०४

## फॉरवर्डस

**प्रेमातलं अपयश काही नकारात्मक विचारांची पेरणी करुन जातं...**

कभी चोट खाई तो कभी दिल संभाला
मोहब्बत भी इक खेल था, खेल डाला

## वाचा तर खरं

✻ नियमित लिंबू पाणी घेतल्यास पोट साफ राहण्यासोबत वजन कमी होण्यासही मदत होते.

✻ लिंबू पाणी पचनक्रियेस मदत करतं. याच्या सेवनानं नैराश्य कमी होऊन उत्साह वाढीस लागतो.

✻ लिंबू पाण्यातील व्हिटॅमिन्समुळे जखमा लवकर भरून येण्यास, ताण कमी होण्यास मदत होते.

✻ लिंबू पाण्यातील अँटीऑक्सिडंटसमुळे त्वचेच्या सुरकुत्या, डाग कमी होण्यास मदत होते तसंच त्वचेचा तजेला वाढण्यास मदत होते.

## करिअरवाटा

### व्हा ॲग्रीकल्चरल मार्केटर

सध्या शेतकऱ्यांचा माल थेट ग्राहकांपर्यंत नेण्यावर भर दिला जात आहे. या पद्धतीत ग्राहकांनाही माल स्वस्त मिळतो आणि शेतकऱ्यांनाही चार पैसे जास्त मिळतात. या यंत्रणेतून ॲग्रीकल्चरल मार्केटर हा नवा घटक उदयाला आला आहे. पीक काढल्यानंतर या घटकाचं काम सुरू होतं, असं सर्वसाधारणपणे मानलं जातं. परंतु प्रत्यक्षात ते त्यापूर्वीच सुरू झालेलं असतं. शेतकऱ्यांना एक सल्ला दिला जातो की, जे पिकवाल ते विकण्याचा प्रयत्न करू नका, परंतु जे विकते ते पिकवा. म्हणजेच बाजारावर नजर ठेवून शेती करा. अशी नजर ठेवणं हे मार्केटिंगचंच काम आहे. म्हणून ॲग्रीकल्चरल मार्केटर हा शेतकऱ्यांना शेतात काय पिकवावं, असा सल्ला देण्यापासून कामात गुंतलेला असतो. शेतमाल पिकवल्यापासून तो माल ग्राहकाच्या हातात पडेपर्यंत निवडणं, साठवणं, पॅकिंग, वाहतूक करणं, प्रोसेस करणं, जाहिरात करणं, वितरण करणं आणि विक्री एवढ्या क्रिया असतात. या सर्व कामात ॲग्रीकल्चरल मार्केटर उपयुक्त असतो. या कामाचं प्रशिक्षण देणाऱ्या काही संस्था कार्यरत झाल्या आहेत. पदवीनंतरचा ॲग्री बिझनेस एम.बी.ए. असा स्वतंत्र कोर्स तयार करण्यात आला आहे. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा.



## खेचाखेची

### आऊटस्टॅंडिंग...

मी इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या लेकीला सांगत होतो, 'आय वॉज द मोस्ट आऊटस्टॅंडिंग स्टुडंट इन द स्कूल.'

.

.

लेक: वॉव! माय ग्रेट बाबा...

.

.

.

(आतून सौभाग्यवती) बाळा, आऊटस्टॅंडिंग म्हणजे रोज वर्गाबाहेर उभं करायचे त्यांना...

## वेगळे काही

चीनमध्ये गर्भवती महिलांचं कोडकौतुक पुरवलं जातं. मात्र त्याचबरोबर त्यांना काही नियमही पाळावे लागतात. गर्भवती अवस्थेमध्ये चीनी महिला मैत्रिणींबरोबर मनमोकळ्या गप्पागोष्टी करू शकत नाहीत. तिला जोरजोरात हसण्यास मनाई केली जाते. गर्भातल्या बाळाच्या स्वास्थ्यासाठी या महिलेनं चिडू नये असा सल्ला दिला जातो. ही महिला जुन्या अथवा उलट्या चटईवर बसू शकत नाही. असं केल्यानं गर्भातील बाळात विकृत निर्माण होतं असा समज आहे. या महिला रात्री झोपताना जवळ एखादी अणकुचीदार वस्तू ठेवतात. यामुळे दुष्टशक्ती आजूबाजूला फिरकत नाहीत अशी त्यांची धारणा असते.

## संगोपन

### वातावरण सकारात्मक हवं

मुलांना सतत कोणत्या ना कोणत्या परीक्षेची तयारी करावी लागते. त्यांचा हा अभ्यास हसत खेळत, तणावरहित व्हावा यासाठी काही मुद्दे लक्षात घेणं गरजेचं ठरतं.



✻ आपल्या मुलांनी भरपूर गुण मिळवावे असं वाटत असलं तरी प्रत्येक मूल वेगळं असतं हे पालकांनी लक्षात घ्यायला हवं. त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव टाकू नका. ✻ मुलांची इतरांशी तुलना करू नका. यामुळे त्यांच्यामध्ये कमीपणाची भावना निर्माण होऊ शकते. ✻ मुलांवर सतत अभ्यास करण्याचा दबाव टाकू नका. अभ्यास करताना मुलांना येणाऱ्या अडचणींचा विचार करा. त्यांच्याशी बोला. एखादा विषय कठीण वाटत असेल तर चर्चा करून मार्ग काढा. ✻ मुलांशी प्रेमाने बोला. कमी गुण मिळाले म्हणून त्यांना ओरडू नका. कमी गुण का मिळाले यामागची कारणं जाणून घ्या. ✻ घरातलं वातावरण सकारात्मक आणि शांत ठेवा. ✻ मुलं डोकेदुखी, अंगदुखी, चक्कर येणं, विस्मरण, भीती वाटणं, अस्वस्थ वाटणं अशा तक्रारी करत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्यांना डॉक्टरांकडे न्या. गरज पडली तर समुपदेशकाची मदत घ्या.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

बुधवार, दि. ३० ऑक्टोबर २०२४ पान ३

# आ. जगताप यांच्यामुळे शहर विकासासाठी मोठा निधी - सीए पितळे

समाचार/नगर-दि.३०

आ. संग्राम जगताप पहिल्या वेळेस आमदार झाले तेव्हा विरोधी बाकावर होते. मात्र, दुसऱ्या वेळेस निवडून आल्यानंतर सत्ताधारी पक्षात होते. मोठा काळ करोना संकट काळात गेला. राज्यात झालेल्या राजकीय उलथापालथीनंतर अत्यंत कमी कालावधी आ.जगताप यांनी राज्य सरकारकडे सतत पाठपुरावा करत हजार कोटींचा निधी शहराच्या विकासासाठी आणला. त्यामुळे आज नगर शहर विकासाच्या दिशेने जात आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र खो-खो संघटनेचे उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ करसल्लागार अशोक पितळे यांनी केले.

आ. जगताप यांना नगर सीए शाखेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. याप्रसंगी अशोक पितळे बोलत होते.



शाखेचे अध्यक्ष सीए सानित मुथा, सचिव अभय कटारिया, खजिनदार महेश तिवारी, माजी अध्यक्ष मोहम बरमेचा, मिलिंद जांगडा, पवन दरक, सुशील जैन, किरण भंडारी उपस्थित होते.

पितळे म्हणाले की गेल्या १२ ते १३ महिन्यात आ. जगताप यांनी अनेक प्रकल्प पूर्णत्वास नेले. क्रीडा संकुलांसाठी १५ ते २० कोटी रुपयांचा निधी दिला. बुरुडगाव येथे अद्यावत हॉस्पिटलची निर्मिती केली .विळद घाट येथे एमआयडीसीसाठी सहाशे एकर जागेची उभारणी केली. त्या माध्यमातून मोठी उद्योग नगरी शहरांमध्ये उभी राहणार आहे.

आ. जगताप म्हणाले, ही निवडणूक विकास कामावर लढवत आहे. शहराला कोण पुढे नेणार हे महत्त्वाचे आहे. शहरातील क्रीडा संकुलांसाठी ५१ कोटीचा स्वतंत्र आराखडा तयार केला त्याला मान्यता घेतली त्यापैकी पंधरा ते वीस कोटी मिळाले .सुपा एमआयडीसी बरोबर नगरच्या एमआयडीसीला मान्यता मिळाली असती परंतु विरोधकांनी त्यामध्ये खोडा घालण्याचे काम केले. विळत घाट येथे ६०० एकर जमीन नूतन एमआयडीसीसाठी उपलब्ध केली. पुढच्या टप्प्यात एमआयडीसीची निर्मिती करणार यामध्ये सर्वांच्या हाताला काम मिळणार आहे.

सीए सानित मुथा म्हणाले, आ. जगताप यांनी आमदारकीच्या माध्यमातून शहराला नवी दिशा देण्याचे काम केले आहे.विकासाची नवी दिशा त्यांनी शहराला दिली . मायक्रोव्हिजन असलेले आमदार आहेत . शहराचा सर्वांगीण विकास त्यांनी केला .त्यांना तिसऱ्यांदा निवडून देण्यासाठी सीए शाखा त्यांच्या पाठीशी आहे.

# हंडीनिमगावमध्ये गावठी कट्टा बाळगणारा जेरबंद

समाचार/नगर-दि.३०

हंडी निमगाव (ता. नेवासा) येथे गावठी कट्टा बाळगणारा तरूण स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केला. पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना माहिती मिळाली की, एक इसम बेकायदेशीरपणे गावठी कट्टा बाळगत असून सध्या तो हांडी निमगाव (ता.नेवासा) येथे आहे. त्यानुसार पोनिदिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर शिंदे, गणेश भिंगारदे, फुरकान शेख, संदीप दरंदले, सोमनाथ झांबरे, किशोर शिरसाठ, मनोज गोसावी, रमीजराजा आतार, मेघराज कोल्हे यांचे पथक तयार करून कारवाई करण्याची सूचना केली. पथकाने छत्रपती संभाजीनगर ते नगर रोडवर हंडी निमगाव येथे संशयीत इसमाचा शोध घेऊन, त्यास ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव सागर निवृत्ती शिंदे (वय २१, रा.सलबतपूर, ता.नेवासा) असे असल्याचे सांगितले. त्याच्या अंगझडतीत ३० हजार रुपये किंमतीचा एक गावठी कट्टा व ५०० रुपये किंमतीचे १ काडतूस असा एकूण ३० हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.




## पान १ वरुन

### महायुती, आघाडीत बंडखोरीचे ग्रहण सुटणार कसे?

श्रीरामपूर मतदारसंघात महायुतीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांनी ए. बी. फॉर्म दिल्याने महायुतीचेच दोन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. अजितदादांच्या राष्ट्रवादीने काँग्रेसचे विद्यमान आमदार लहू कानडे यांना पक्षात प्रवेश देत उमेदवारी दिली तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने माजी आ. भाऊसाहेब कांबळे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. नेवासा मतदारसंघात महायुतीत भाजपाचे उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार झाले. तेथे महायुतीत जागा शिवसेनेला पण उमेदवार भाजपाचा अशी स्थिती झाली. त्यामुळे भाजपाचे दुसरे इच्छुक उमेदवार माजी आ. बाळासाहेब मुरकुटे यांनी प्रहार जनशक्ती पक्षाकडून उमेदवारी दाखल केली. नेवासा मतदारसंघात आघाडीकडून उद्धवसेनेचे उमेदवार विद्यमान आ. शंकरराव गडाख विरुद्ध महायुतीतील शिंदेसेनेचे उमेदवार विठ्ठलराव लंघे आणि प्रहार जनशक्तीचे उमेदवार माजी आ. बाळासाहेब मुरकुटे असा चुरशीचा सामना रंगणार आहे. श्रीगोंदा मतदारसंघासाठी आघाडीत खा. शरद पवार यांची राष्ट्रवादी आग्रही होती. माजी आ. राहुल जगताप यांची उमेदवारीही निश्चित होती. मात्र उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने ही जागा स्वतःकडे घेतली. तेथे अजितदादांच्या राष्ट्रवादीतून शिवसेनेत दाखल झालेल्या जिल्हा परिषदेच्या माजी सभापती अनुराधा नागवडे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे नाराज माजी आ. राहुल जगताप, काँग्रेसचे नेते घनश्याम शेलार यांनी अपक्ष उमेदवारी करीत बंडखोरी केली आहे. महायुतीत भाजपची उमेदवारी न मिळाल्याने पक्षाच्या पदाधिकारी सुवर्णा पाचपुते यांनी बंड करीत निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे. महायुतीत अकोले मतदारसंघाची जागा अजितदादांच्या राष्ट्रवादीकडे गेल्याने भाजपाचे माजी आ. वैभव पिचड हेही अपक्ष उमेदवारी दाखल करत निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या शिर्डी मतदारसंघात आघाडीकडून काँग्रेसच्या प्रभावती घोगरे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या मतदारसंघात विखे विरोधक डॉ. राजेंद्र पिपाडा आणि माजी नगराध्यक्षा ममता पिपाडा यांनीही उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणूक लढविण्याची भूमिका घेतली आहे. आताच्या विधानसभा निवडणुकीसाठी कोपरगाव, राहुरी आणि संगमनेर मतदारसंघाचा अपवाद वगळता महायुती आणि महाविकास आघाडीत बहुतांश ठिकाणी उमेदवारी न मिळालेल्या दिग्गज इच्छुकांनी अपक्ष किंवा अन्य पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यामुळे महायुती आणि आघाडी यांची डोकेदुखी वाढली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत जिल्ह्यातील या मतदारसंघातील किती बंडखोर उमेदवार माघार घेतात आणि किती उमेदवार प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात राहतात, याकडेच आता महायुती आणि आघाडीच्या कार्यकर्त्यांचे लक्ष आहे. महायुती आणि आघाडीचे श्रेष्ठी आपापल्या बंडखोरांची कशी समजूत घालतात, त्यांना काय शब्द दिला जातो, हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

# जामखेडमध्ये पोलिसांचा रूट मार्च




समाचार/जामखेड-दि.३०

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जामखेड शहरातील संवेदनशील ठिकाणे व मिश्र वस्ती भागातून आयटीबीपीचे ४ अधिकारी, ३७ जवान तसेच जामखेड पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक अधिकारी वर्षा जाधव, नंदकुमार सोनवलकर व १५ पोलीस अंमलदार यांच्या उपस्थितीत शनिवारी रूट मार्च घेण्यात आला.

विधानसभा निवडणुकीच्या पाश्वभूमीवर जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी ४०० च्या आसपास लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. तसेच शहरातील संवेदनशील व मिश्र भागात शांतता रहावे व भयमुक्त वातावरणात निवडणूक व्हावी यादृष्टीने शनिवारी रूट मार्च जामखेड शहरातून अयोजीत केला होता हा रूट मार्च जामखेड पोलीस स्टेशन येथून सुरुवात होऊन बीड कॉर्नर,जयहिंद चौक, छत्रपती शिवाजी महाराज पेठ, संविधान चौक, खर्डा रोड, ए वन कॉर्नर, खर्डा चौक, तपनेश्वर रोड, नुराणी कॉलनी, खाडे नगर, एसटी बस स्टँड, नगर रोड, पंचायत समिती व नंतर पोलीस स्टेशनला समारोप करण्यात आला.

### हरदिन मॉर्निंग ग्रुपचा उपक्रम

# वंचित घटकातील ज्येष्ठांची दिवाळी झाली गोड



समाचार/नगर-दि.३०

पर्यावरण व आरोग्य क्षेत्रासह सामाजिक कार्यात सातत्याने योगदान देणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने निराधार व वंचित घटकातील ज्येष्ठ नागरिकांची दिवाळी गोड करण्यात आली. भिंगार व शहरातील विविध मंदिरांच्या ठिकाणी भेटी देऊन तेथे बसलेल्या निराधार घटकातील व्यक्तींना मिठाई व फराळचे वाटप करण्यात आले.

भिंगार येथील रोकडेश्वरर हनुमान मंदिरातील निराधार ज्येष्ठ नागरिकांना मिष्टान्न भोजनाचे वाटप करुन मिठाई व फराळचे पाकिट भेट देण्यात आले. तसेच भिंगार येथील शैनेश्वार मंदिर, सर्जेपुरा येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिर व माळीवाडा येथील शनी मारुती मंदिर येथील निराधार असलेल्या भिक्षेकरी यांना फराळ व मिठाईचे वाटप करण्यात आले.

महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार झंवर व हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते मिठाईच्या पाकिटांचे वितरण करण्यात आले. यावेळी रमेश वराडे, मेजर दिलीप ठोकळ, जहीर सय्यद, सुमेश केदारे, सर्वेश सपकाळ, सचिन चोपडा, दिलीप गुगळे, मनोहर दरवडे, रतन मेहेत्रे, हरीश साळुंके, दीपक धाडगे, अशोक पराते, दीपक बडदे, अभिजीत सपकाळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, प्रवीण परदेशी, शेषराव पालवे, विलास आहेर, गोरक्षनाथ वामन, अविनाश जाधव, मेजर विनोद खोत, संपतराव बेरड, रमेश खंडेलवाल, सुनील कसबे आदी उपस्थित होते. संजय सपकाळ, नंदकुमार झंवर यांची भाषणे झाली.



# अंतरवली सराटीत उद्या प्रमुख धर्मगुरुंची बैठक

समाचार/नगर-दि.३०

विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी पंधरा-वीस दिवसापासून मराठा मुस्लिम, दलित समीकरण जुळवणे सुरू आहे. या संदर्भात अधिकृत माहिती ३१ ऑक्टोबर रोजी बैठकीत ठरणार असल्याचे सांगितले व मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे मराठा, मुस्लिम, दलित समाजाचे धर्मगुरू व मुख्य पदाधिकारी बोलावून बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मुस्लिम समाजाचे धर्मगुरू मौलाना सज्जाद नोमानी उपस्थित राहणार आहे तसेच मुस्लिम समाजचे प्रमुख धर्मगुरु व इतर जबाबदार लोक महाराष्ट्र राज्यतुन बैठकित उपस्थित राहणार असल्याची माहिती ऑल इंडिया उलमा बोर्ड (रजी) चे महासचिव अंजर अनवर खान यानी दिली.

समीकरण जुळवणे अत्यंत आवश्यक आहे एका जातीवर निवडणूक लढवली जात नाही उमेदवारांनी अंतरवालीत गर्दी करू नये मराठा, मुस्लिम, दलित हे एकत्र यायला पाहिजे मग राज्यात १०० टक्के परिवर्तन होऊ शकते. बऱ्याच दिवसांपासुन प्रयत्न चालू होते, अशी माहिती ऑल इंडिया उलमा बोर्ड (रजी) चे महासचिव अंजर अनवर खान यांनी दिली.

# विकासकामे बंद पाडणाऱ्या लोकप्रतिनिधींना मतदानातून धडा शिकवा-कर्डिले

समाचार/नगर-दि.३०

विधानसभेची यंदाची निवडणूक न लढवण्याचा माझा विचार होता. परंतु मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेचे प्रेम व आग्रहास्तव मी पुन्हा एकदा त्याच जोमाने लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहे. मागील निवडणुकीत माझा पराभव झाला. त्यावेळी विद्यमान लोकप्रतिनिधीने दिलेल्या आश्वासनांची ते पूर्तता करू शकले नाहीत. त्यामुळे जनतेच्या पदरी निराशा पडली. विकासकामे बंद पाडणाऱ्या विद्यमान लोकप्रतिनिधींना मतदानातून धडा शिकवण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री शिवाजी कर्डिले यांनी केले. कर्डिले यांनी शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यानंतर त्यांनी राहुरी शहरातून रॅली काढली. यावेळी ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, आसाराम ढूस, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, विक्रम तांबे, सुभाष गायकवाड, विनायक देशमुख, अक्षय कर्डिले, राजू शेटे, संभाजी पालवे, धनंजय गाडे, संदीप कर्डिले उपस्थित होते.




**संभाजी पालवे यांचा भाजपमध्ये प्रवेश माजी सभापती संभाजी पालवे यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश करून कर्डिले यांना साथ देण्याचे जाहीर केले. त्यांनी कर्डिले यांची विकासकामे करण्याची हातोटी, यामुळे पालवे यांनी कमळ हाती घेतले आहे.**

कर्डिले म्हणाले, माझ्याकडे कुठलाही कारखाना, शैक्षणिक संस्था नाही.आमदार नसतानाही जनता माझ्याकडे व्यक्तिगत तसेच विकासाची कामे घेऊन येते. त्यांचे प्रश्न, अडीअडचणी सोडवण्याचे काम मी करीत असतो. तीस वर्षांपासून विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज दाखल करीत आहे. पण यावर्षी रेकॉर्ड ब्रेक गर्दी जमली असल्यामुळे माझा विजय आजच निश्चित झाला आहे. मी मंजूर केलेल्या विकासाच्या योजना बंद पाडण्याचे काम या लोकप्रतिनिधींनी पाच वर्षात केले आहे.

राहुरी शहराची पाणीपुरवठा योजना माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंजूर करून घेतली होती. त्याचे श्रेय मला मिळू नये म्हणून ते मंत्री झाल्यानंतर ही योजना बंद करण्याचे काम त्यांनी केले.

**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## मुंबई शेअर भाव

**एनटीपीसी भांडवल बाजारात**

**भरणा १० तारखेपासून**

(शेअर सबब्रोकर)

अशोक पटवा

फोन-२४५२५२७, २४५२२६४

मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक ३१-१०-२०२४**

**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ८००२० |
| एसीसी | २३४८-४९ |
| एशियन पेंट | २९८५-८६ |
| बजाज ऑटो लि. | ९९९०-९१ |
| बलराम फूड चिनी | ६६२-६३ |
| भारत फोर्ज | १४२६-२७ |
| क्रॉम्प्टन | ३९३-९४ |
| डीएलएफ | ८२९-३० |
| डॉ. रेड्डीज् लॅब | १२४८-४९ |
| ग्रॅफाईट इंडिया | ५२२-२३ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २५५७-५८ |
| आयटीसी लि. | ४८९-९० |
| एल ॲण्ड टी लि. | ३४१३-१४ |
| रिलायन्स इंड. | १३४०-४१ |
| एसबीआय | ८२४-२५ |
| टाटा मोटर्स | ८४५-४६ |
| टाटा स्टील | १४९-५० |
| टीसीएस | ४०९४-९५ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २६८-६९ |
| सुवेन फार्मा | १२६४-६५ |

### मुलांच्या उच्चशिक्षणासाठीच्या धनादेशाचे वितरण

# माथाडी पतसंस्थेचे कार्य उल्लेखनीय- घुले



**समाचार/नगर-दि.३०**

स्व.शंकरराव घुले माथाडी पतसंस्थेच्या वतीने जे माथाडी कामगार आहेत. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पतसंस्थेच्यावतीने स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. पतसंस्थेचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांनी अतिशय नाविन्यपुर्ण उपक्रम त्यांच्या कार्यकिर्दीमध्ये राबवुन माथाडी कामगारांच्या मुलांना शिक्षणांमध्ये कोणतीही अडचण भासणार नाही असे पतसंस्थेने करुन दाखविले आहे, आज ज्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी जी मदत करण्यात आली. त्यातुन ते निश्चित अभ्यास करुन भविष्य उज्वल करतील असे प्रतिपादन हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी केले.

स्व.शंकरराव घुले माथडी कामगार सहकारी पतसंस्थेच्यावतीने माथाडी कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदतीच्या धनादेशाचे वितरण जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पतसंस्थेचे अध्यक्ष रविंद्र भोसले, संजय घुले, सागर पोळ, दिगंबर सोनवणे, सचिव मधुकर केकाण, सहसचिव बबन सुसे, गोरक्षनाथ भोरे, अनिल लांबे, अभिषेक भोरे, मुकादम गायकवाड, तबाजी कार्ले, कौसर पठाण, अर्जुन शिंदे, असिफ कादरी आदी उपस्थित होते.

प्रास्तविकात अध्यक्ष रविंद्र भोसले म्हणाले कि, आमचे संचालक मंडळ नेहमीच कामगारांच्या हिताच्या दृष्टीने विचार करत असते. कामगारांसाठी वेगवेगळ्या योजना कशा आणता येतील, याबाबत हमाल पंचायत जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांचे कायम मार्गदर्शन घेत असतो. माथाडी कामगारांचे मुले सुद्धा विविध क्षेत्रामध्ये नैपुण्य मिळवुन मोठ्या पदावर विराजमान आहेत व भविष्यात हे देखील विद्यार्थी चमकदार कामगिरी करुन आपले भविष्य उज्वल करुन आई-वडीलांबरोबरच पतसंस्थेचे व हमाल पंचायतीचे नाव लौकिक करतील, असे त्यांनी सांगितले.

# गोसेवा समितीच्या चित्रकला स्पर्धेत ५८ विद्यार्थ्यांचा सहभाग

**समाचार/नगर-दि.३०**

गोसेवा समिती अहिल्यानगर आणि राष्ट्रहित संवर्धक मंडळ यांच्या तर्फे 'वसुबारस २०२४' निमित्त घेण्यात आलेल्या लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा २७ रोजी ऋग्वेद भवन, चितळे रोड येथे पार पडली. स्पर्धे साठी एकूण ५८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

त्यात गट क्रमांक एक मध्ये २० गट क्रमांक दोन मध्ये १६ गट क्रमांक तीनमध्ये १३ विद्यार्थी तसेच दिव्यांग गटात ९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. 'गट क्रमांक एक' मध्ये प्रथम क्रमांक वीरांश शहा, द्वितीय राजवीर भंडारी, तृतीय आर्वी मानधने. 'द्वितीय गटात' नक्षत्रा नका, आरोही टाक, आचल भगत. 'तृतीय गटात' दैविक दळवी, अमोघ भुसा, अनुष्का चौधरी आणि 'दिव्यांग गटात' तुळशीराम किरकिरे, दीपक राऊत, माधुरी चव्हाण यांना अनुक्रमे बक्षिसे मिळाली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना गो उत्पादने भेट म्हणून देण्यात आली. गाईचे निर्भेळ दूध तसेच लाडू वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. विद्यार्थ्यांबरोबर जवळपास १०० पालक उपस्थित होते.

कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून ह.भ.प.प्रभाताई भोंग होत्या. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह हिराकांत रामदासी, निवृत्त शेतकी अधिकारी माधवराव देशमुख आणि श्रीकृष्ण गोवर्धन गोशाळा, शेंडी अहिल्यानगरचे संस्थापक डॉ. पद्माकर रासवे, एमडी (पंचगव्य चिकित्सा तज्ञ) यांची प्रमुख उपस्थिती होती.

चित्रकला स्पर्धेसाठी लहान मुलांचे प्रसिद्ध दंततज्ञ डॉ. अमोल जाधव आणि गोप्रेमी अनिकेत कौर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन महाजन यांनी केले. आभार प्रदर्शन प्रिया कोठारी यांनी मानले.

### सांदिपनी ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांचा पुढाकार

# वंचित व निराधार बालकांसह दिवाळी साजरी




**समाचार/नगर-दि.३०**

सांदिपनी अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी समाजातील वंचित व निराधार बालकांसह तपोवन रोड येथील बालघर प्रकल्पात दिवाळी साजरी केली. वंचित घटकातील मुलांची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला होता. लखलखत्या पणत्यांचा झगमगाटात व फटाक्यांच्या आतषबाजीत दिवाळीचा आनंद वंचितांसह साजरा करण्यात आला.

सांदिपनी अकॅडमी दरवर्षी आपल्या विद्यार्थ्यांसह बालघर प्रकल्पातील मुलांसह दिवाळी साजरी करत असतात. यावर्षी अकॅडमीच्या वतीने संस्थेतील मुलांसाठी दिवाळीला फराळ करण्यासाठी लागणारे सर्व किराणा साहित्याची भेट दिली. तर संस्थेच्या मुलांनी बनवलेल्या पणत्या, आकाश दिव्यांच्या स्टॉलवरुन अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी खरेदी करुन त्यांना प्रोत्साहन दिले.

अकॅडमीचे व्यवस्थापकीय संचालक के. बालराजू यांच्या मार्गदर्शनाखाली व बालघर प्रकल्पाचे युवराज गुंड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी अकॅडमीचे प्रा. नानासाहेब बारहाते, प्रा. राहुल गुजराल, अतिश काळे, सुधीर काळे, सामाजिक कार्यकर्ते मोहसीन सय्यद आदींसह अकॅडमीचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# अनाथांची सेवा करणाऱ्या महिला सन्मानाने भारावल्या




**समाचार/नगर-दि.३०**

निरंजन सेवा भावी संस्थेने अनाथ मुलांची सेवा करणाऱ्या महिलांचा सन्मान करुन त्यांना कपडे व फराळ वाटप केले. जे वर्षभर सेवा देवुन अनाथ मुलांची सेवा करतात अशा महिलांचा दिवाळी सणानिमित्त सन्मान केल्याने त्यांनी केलेल्या कार्याचा खऱ्या अर्थांने गौरव झाला, असल्याचे प्रतिपादन योगिता कुलकर्णी यांनी केले. निरंजन सेवा भावी संस्था यांच्या वतीने मानव सेवा प्रकलप, सावली संस्था, बालघर, स्नेहांकुर दत्तक विधान केंद्र, केंडगाव आदी संस्था मधील महिलांचा दिवाळी निमित्त सन्मान करुन त्यांना फराळ व कपडे वाटप करण्यात आले. योगिता कुलकर्णी, प्राजक्ता डागा, श्रुती डागा, कृष्णा धूत, अतुल डागा, स्वप्नील कुलकर्णी, मुकुंद धूत आदी उपस्थित होते. यावेळी मानव सेवा प्रकल्प, सावली संस्था आणि बालघर, स्नेहाकुंर येथील महिलांना दिवाळी भाऊबीजनिमित्त एक नवीन साडी, मिठाई बॉक्स, फराळ देण्यात आले.

प्रास्तविकात प्राजक्ता डागा म्हणाल्या की, निरंजन सेवाभावी संस्थेच्यावतीने नेहमची सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. अनाथ मुलांचे संगोपण करणार्या संस्थामधील महिलांचा सन्मान करुन त्यांचा फराळ व साड्याचे वाटप करण्यात आले. जेणे करुन त्यांनी वर्षभर केलेल्या कार्याचा गौरवा व्हावा, यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.

# सेलकोर गॅझेट्सची दक्षिण भारत आणि गुजरातमध्ये रिटेल नेटवर्क विस्ताराची घोषणा

सेलकोर गॅझेट्स लिमिटेड (NSE SME: CELLECOR), भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडपैकी एक कंपनी असून, दक्षिण भारत आणि गुजरातमधील आघाडीच्या किरकोळ साखळ्यांसोबत सहयोगाची मालिका जाहीर करण्यास उत्सुक आहे. हे सहकार्य सेलकोरच्या किरकोळ फुटप्रिंटचा विस्तार करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून चिन्हांकित करते, ज्यामुळे त्याच्या विविध उत्पादनांची श्रेणी ग्राहकांसाठी अधिक सुलभ बनते. सेलकोरने दक्षिण भारतातील दोन प्रमुख किरकोळ साखळी, संगिता मोबाईल्स प्रायव्हेट लिमिटेड (व्हॅम इन्फोकॉम प्रायव्हेट लिमिटेड) आणि सेलबे मोबाईल्स आणि इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी सहयोग केला आहे. हे सहकार्य तेलंगणा आणि आंध्र प्रदेशमध्ये सेलकोरचे अस्तित्व वाढवेल आणि ग्राहकांना विविध प्रकारांमध्ये थेट प्रवेश प्रदान करेल. स्मार्ट टीव्ही, स्मार्ट गॅझेट्स, मोबाईल फोन आणि गृह उपकरणे यासह उत्पादनांची शृंखला देखील वाढणार आहे. ८०० हून अधिक स्टोअर्स असलेले विश्वसनीय नाव संगीता मोबाईल्ससोबत सहयोग करून, सेलकोरचे उद्दिष्ट अधिक प्रमाणात ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे आहे. संगिताचे विस्तृत रिटेल नेटवर्क ग्राहकांना नवीनतम तंत्रज्ञान आणि अखंड इन-स्टोअर अनुभव देते, ज्यामुळे नाविन्यपूर्ण आणि उच्च-गुणवत्तेची उत्पादने वितरित करण्याच्या सेलकोरच्या धोरणाला बळकटी मिळते. तेलंगणातील सर्वात वेगाने वाढणारी मल्टी-ब्रँड मोबाईल रिटेल चेन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सेलबेसोबत सेलकोरचे सहकार्य कंपनीचा आवाका आणखी वाढवेल. ५० हून अधिक स्टोअर्ससह, सेलबेचे मजबूत रिटेल प्लॅटफॉर्म ग्राहकांना सेलकोरच्या विस्तृत श्रेणीतील इलेक्ट्रॉनिक्स आणि उपकरणे एक्सप्लोर करण्याची उत्तम संधी प्रदान करते, ज्यामुळे अधिक सुविधा आणि विश्वासार्हता सुनिश्चित होते.

दक्षिण भारतातील वाढीबरोबरच, सेलकोर आघाडीच्या रिटेल साखळींच्या सहकार्याने गुजरातमध्ये आपली बाजारपेठ मजबूत करत आहे: पुजारा टेलिकॉम प्रायव्हेट लिमिटेड, फोनवाले लिमिटेड, उमिया मोबाईल प्रायव्हेट लिमिटेड आणि रामदेव मोबाईल्स. या अप्लायन्सेस संपूर्ण राज्यात सेलकोरची पोहोच वाढवण्याच्या तयारीत आहेत, प्रमुख शहरे आणि गावांमधील ग्राहकांना त्याच्या विस्तीर्ण उत्पादनांच्या श्रेणीमध्ये प्रवेश प्रदान करतात.

फोन वेल लिमिटेड गुजरातमध्ये ५०० हून अधिक स्टोअर्स चालवते, शहरी आणि निम-शहरी दोन्ही भागात मजबूत उपस्थिती आहे. ग्राहक-केंद्रित दृष्टिकोनासाठी ओळखले जाणारे, फोन वेलंचे स्टोअर इलेक्ट्रॉनिक्सची व्यापक श्रेणी ऑफर करतात, ज्यामुळे ते तंत्रज्ञान-जाणकार ग्राहकांसाठी एक विश्वासार्ह नाव बनले आहे.

पुजारा टेलिकॉम लिमिटेडकडे संपूर्ण प्रदेशात ५००+ स्टोअर्सचे नेटवर्क आहे, जे मोबाईल डिव्हाइसेस, स्मार्ट गॅझेट्स आणि ॲक्सेसरीजमध्ये खास आहेत. या सहयोगामुळे ग्राहकांना सेलकोरच्या नवीनत्म उत्पादनांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल, याची खात्री करून ते बाजारात उपलब्ध असलेल्या सर्वोत्तम पर्यायांमधून निवड करू शकतील. उमिया मोबाईल प्रायव्हेट लिमिटेड संपूर्ण गुजरातमध्ये १५० हून अधिक स्टोअर्स धोरणात्मकरित्या स्थित आहे. उत्कृष्ट ग्राहक सेवा आणि स्पर्धात्मक किंमतीसाठी प्रतिष्ठेसह, उमिया मोबाईल कार्यरत आहे.

# जीआरएम ओव्हरसीजने सुपरमकँडोस सेंट्रलसह भागीदारीद्वारे जागतिक उपस्थिती वाढवली

जीआरएम ओवरसिज लिमिटेड (BSE: 531449, NSE: GRMOVER), बासमती तांदळाचा प्रसिद्ध भारतीय निर्यातक आणि एफएमसीजी क्षेत्रातील एक प्रमुख खेळाडू, कंपनीने चिलीमधील सुपर मरकोडास सेंट्रल लिमिटेड सोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. हे सहकार्य जी आर एमच्या जागतिक विस्ताराच्या प्रयत्नांमधील एक महत्त्वाचा क्षण आहे. कारण ते सुपरमकँडोस सेंट्रल लिमिटेडच्या विस्तृत वितरण नेटवर्कद्वारे चिलीच्या ग्राहकांना त्याचा फ्लॅगशिप बासमती तांदूळ ब्रँड तनुष सादर करते. 'तनुष' १ किलो आणि ५ किलो पॅकमध्ये ऑफर केला जाईल.

करारानुसार,सुपर मरकोडोस सेंट्रल लिमिटेड चिलीमधील या प्रदेशात मजबूत उपस्थिती आणि सिध्द क्षमता सहजी आर एम ओव्हरसीज उत्पादनांचे अनन्य वितरक म्हणून काम करेल. सुपर मर्कोडोस सेंट्रल लिमिटेड जी आर एम च्या बाजारपेठेतील प्रवेशाला चालना देण्यासाठी आणि त्याची ब्रँड दृश्यमानता वाढवण्यासाठी सुसज्ञ आहे.

जीआरएम ओव्हरसीजचे अध्यक्ष आणि एमडी श्री अतुल गर्ग यांनी टिप्पणी केली, सुपरमकँडोस सेंट्रल लिमिटेड सोबतची आमची भागीदारी ही आमची जागतिक पाऊलखुणा बळकट करण्यासाठी एक धोरणात्मक पाऊल आहे. सुपर मारकोडोस सेंट्रल लिमिटेडच्या मजबूत वितरण नेटवर्कचा आणि स्थानिक कौशल्याचा फायदा घेऊन, आमचा चिलीमध्ये प्रवेश वाढवण्याचे आमचे ध्येय आहे. हे सहकार्य आमची आंतरराष्ट्रीय उपस्थिती वाढवण्याची आणि ग्राहकांना प्रीमियम दर्जाची उत्पादने देण्यासाठी आमची बांधिलकी अधोरेखित करते.

# अहमदाबाद स्थित राजेश पॉवर सर्व्हिसेसने बीएसई एसएमईकडे डीआरएचपी केली फाइल

राजेश पॉवर सर्व्हिसेस लिमिटेड उर्जा क्षेत्रातील आघाडीच्या सेवा प्रदात्यांपैकी एक कँपनी असून, बीएसइ,एनएसइ सोबत ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल करण्याची घोषणा केली. कँपनीच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरमध्ये २७,९०,००० इक्विटी शेअर्सचे नवीन जारी करणे समाविष्ट आहे, प्रत्येकाचे दर्शनी मूल्य रु.१० आणि २०,००,००० असून इक्विटी शेअर्सच्या विक्रीची ऑफर, प्रत्येकी रु. १०, बुक-बिल्डिंग मार्गाने उभी केली जाणार. विक्रीची ऑफर बीना पांचाल, कृणाल पांचाल, नेहल पांचाळ, राजेंद्र बलदेवभाई पटेल, प्रफुल्ल पटेल, विशाल पटेल, कलाबेन कांतीभाई पटेल आणि ज्योत्स्ना रमेश पटेल या विक्री भागधारकांनी केली आहे. ISK ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड ही इश्यूसाठी एकमेव बुक रनिंग लीड मॅनेजर आहे आणि बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड हे रजिस्ट्रार आहेत. RPSL अनेक दशकांपासून ईपीसी (इंजिनीअरिंग, प्रोक्योरमेंट आणि कन्स्ट्रक्शन) करार आणि टर्नकी सेवा प्रदान करण्याच्या व्यवसायात आहे.

# आर्थिक वर्ष २५ मध्ये जिजी अभियांत्रिकीच्या महसुलात वार्षिक ९०% वाढ

जी जी इंजीनियरिंग लिमिटेड (BSE: 540614), पायाभूत आणि संरचनात्मक पोलाद, आणि अभियांत्रिकी उत्पादने उद्योगातील एक अग्रगण्य खेळाडू, कंपनी, असून २३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीत कंपनीने कंपनीच्या दीड वर्षातील अनपरीक्षित आर्थिक निकालांना मान्यता दिली आहे.

३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीत, ऑपरेशन्समधील महसूल रु. ४४.३३% वाढला आहे. आर्थिक वर्ष २४ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये ७३२४.१२ लाख ते रु. आर्थिक वर्ष २०२५ चे दुसऱ्या तिमाहीत१०५७०.९६ लाख झाला आहे.

एबिता रूपये १०२८.७५% ने वाढला. आर्थिक वर्ष २०२४ चे दुसऱ्या तिमाहीत १२६.५७ लाख ते रु. आर्थिक वर्ष २०२५ चे दुसऱ्या तिमाहीत १४२८.६६ लाख झाला आहे. इबिता मार्जिन २०२४ चे दुसऱ्या तिमाहीमध्ये १.७३% वरून आर्थिक वर्ष २०२५ चे दुसऱ्या तिमाही मध्ये ११६६ bps ने वाढून १३.३९% झाले. PAT १३००.११% ने वाढला. आर्थिक वर्ष २०२४ चे दुसऱ्या तिमाहीमध्ये ७५.३१ लाख ते आर्थिक वर्ष २०२५ चे दुसऱ्या तिमाहीत १०५४.४२ लाख दर्शविला आहे.

३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या सहामाहीसाठी, ऑपरेशनमधील महसूल १०६.२३% वाढला आहे. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ९२१८.७९ लाख ते आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १७५४४.०३ लाख इतका महसूल वाढला आहे. एबिता ६०६.५९% ने वाढला आहे.




संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

## शब्दखेळ - २६६

**खाली दिलेल्या चौकोनात नामांकित दिवाळी अंकांची नाव लपलेली आहेत. शोधा पाहू.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | डॉ | आ | ई | ब | आ | उ | स |
| ता | अं | बं | रो | रो | टी | से | पा |
| द | दा | दु | दु | फ | फ | ज | री |
| ज | ज | मा | श्म | मा | टा | न्म | वा |
| न | बा | तो | न | उ | क | दा | मा |
| नी | स | श्री | को | ली | र | ळ | य |
| पु | म | मा | ली | क | ब | डे | द |
| ज | न्म | दा | त्री | ल | अं | बा | क |

**शब्दखेळ - २६५ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क | स | को | ल्हे | र | भो | ळे | बे |
| वें | प | खो | र्द | इं | ट | श्वे | दा |
| आ | का | मे | ब्ब | कृ | अं | के | का |
| क | शो | ळे | दा | जो | शे | ळी | णे |
| ब | र | रा | श | जू | ग | रा | शो |
| वें | पा | णे | धी | का | र | आ | र |
| यु | ट्या | ना | दो | चौ | दा | ते | रा |
| ध्ह | ना | सा | ने | र | ह | म | मं |

# शक्तीप्रदर्शनाने राहुल जगताप यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज



**समाचार/श्रीगोंदा-दि.३०**

श्रीगोंदा–नगर विधानसभा मतदार संघामध्ये राहुल जगताप यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. भैरवनाथ मंदिरापासून रॅलीला सुरुवात करून शेख महंमद महाराज पटांगणामध्ये सभा पार पडली. मोठे शक्ती प्रदर्शन करत राहूल जगताप यांनी निवडणुकीचे रणसिंग फुंकले तसेच सभेत प्रचाराचा नारळ ही फोडला.

राहुल जगताप म्हणाले, माझा उमेदवारी अर्ज सामान्य जनतेने भरला आहे. आता माझ्या उमेदवारीचा निर्णय मुंबईतून नाही तर तो श्रीगोंद्यातील सामान्य जनतेतून होईल. तडजोड माझ्याकडे होत नाही. निर्णय आता तुमच्या हातात आहे. निवडणुकीतून आता माघार घेणार नाही, ही निवडणूक आता सामान्य जनतेची झाली आहे. विरोधकांनी लोक गोळा करण्यासाठी लाभ दिला. स्टेटस ठेवायलाही वेगळा लाभ दिला, अशी टीका त्यांनी केली. जर आता उमेदवारी मागे घ्या असं कोणी म्हणाले तर कोणत्याही वरिष्ठांचा फोन उचलणार नाही, या आधी सुद्धा तडजोडीच्या राजकारणात माझा यांनी बळी घेतला. आता पुन्हा असे होऊ देणार नाही. यावेळी केशव मगर यांच्या हस्ते प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. सागर बोरुडे, सकलेन शेख, अतुल लोखंडे, दीपक भोसले,रंगनाथ निमसे, हरिदास शिर्के यांची भाषणे झाली. सूत्रसंचालन अतुल लोखंडे यांनी केले.

## वाहनाच्या धडकेत वृध्दाचा मृत्यू

**समाचार/नगर-दि.३०**

अज्ञात वाहनाच्या धडकेत एका ५५ वर्षीय वृध्दाचा मृत्यू झाल्याची घटना लालटाकी ते पत्रकार चौक रस्त्याच्या दरम्यान घडली. दरम्यान, मयत वृध्दाची ओळख पटलेली नाही. या प्रकरणी पोलिस अंमलदार विनोद गंगावणे यांनी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात वाहनावरील अज्ञात चालकाविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ५५ वर्षीय वृध्दाला लालटाकी ते पत्रकार चौक रस्त्याच्या दरम्यान सारडा कॉलेजच्या गेट समोर अज्ञात वाहनावरील अज्ञात चालकाने धडक दिली. या धडकेत जखमी झालेल्या वृध्दाला उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथील डॉक्टरांनी त्यांची तपासणी करून मृत घोषीत केले. दरम्यान, सदर वृध्द व्यक्तीची ओळख न पटल्यामुळे पोलिसांनी फिर्यादी होत गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक पुनम श्रीवास्तव करत आहेत.




### शंभर टक्के मतदानाचा मनपात संकल्प

# लोकशाही बळकटीसाठी मतदानाचे कर्तव्य पार पाडावे-डांगे

**समाचार/नगर-दि.३०**

लोकशाही बळकट करण्यासाठी नागरिकांनी सजगपणे मतदान करणे गरजेचे आहे. मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत सर्व मतदार नागरिकांनी १०० टक्के मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनपात मतदार जागृती व १०० टक्के मतदान संकल्प अभियान राबविण्यात आले. यावेळी ते बोलत होते. आयुक्त यशवंत डांगे यांनी उपस्थित नागरिक, कर्मचारी व अधिकाऱ्यांना मतदान संकल्पाची शपथ दिली. यावेळी उपायुक्त प्रियंका शिंदे, निखिल फराटे, सहायक आयुक्त सपना वसावा, मुख्य लेखाधिकारी सचिन धस, सहायक आयुक्त मेहेर लहारे, अशोक साबळे, प्रसिध्दी अधिकारी शशिकांत नजान, अनिल लोंढे, लक्ष्मण लांडगे आदींसह कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

### मोबाईलपासून दूर राहण्याचा मुलांना संदेश

# आजी-आजोबांसह बालमित्रांनी लुटला बालगीतांचा आनंद

**समाचार/नगर-दि.३०**

गंपू आणि ढंपू, करवंदाच्या दाट जाळीत, हत्ती दादा, असावा सुंदर चॉकलेटचा बंगला सारखी अनेक सुंदर बालगीत बालकलाकारांनी गायली आणि बच्चे पार्टीने त्या तालावर ठेका ही धरलां. 'गीतानंद फाउंडेशन आणि बालरंगभूमी परिषद' यांच्या संयुक्त विद्यमानं 'गड्यांनो दीपावली आली' हा कार्यक्रम वसुबारसाच्या दिवशी माऊली सभागृहात संपन्न झाला. दिवाळी निमित्त मोठ्यांसाठी अनेक सांगीतिक कार्यक्रम होतात, पण नगर मधला बच्चे कंपनीसाठी झालेला हा पहिलाच कार्यक्रम ठरला.



कै. केशव भणगे यांनी लिहिलेली आणि गायक संगीतकार पवन श्रीकांत नाईक यांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्यांचा विशेष समावेश या कार्यक्रमात करण्यात आला होता. या सर्व नवीन गाण्यांना पालकांनी आणि बालकांनी उत्तम प्रतिसाद दिला. आरोही बेडेकर,मुलांशू परदेशी, प्रांजल भालेराव, इरा कुलकर्णी, प्रभास पाठक या बाल कलाकारांनी ही बालगीते सादर केली. संगीत संयोजन व संवादिनीची साथ ऋतुजा पाठक यांची होती. तबला साथ हर्षद भावे, कीबोर्डची साथ डविन पेरेपाडम, ऑक्टोपॅडची साथ निलेश सोज्वळ यांनी केले. मुलांचं कौतुक करण्यासाठी शिंगवी ज्वेलर्सचे गुंजन शिंगवी, परफेक्ट व्हील्सच्या शीतल खिलारी तर स्माईल एक्स एल डेंटल क्लिनिकचे डॉ ओंकार कुलकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमात 'वैशाली भणगे आणि पवन नाईक' यांचा सन्मान करण्यात आला.

लहान मुलांनी मोबाईलचा वापर कमी करावा आणि मैदानी खेळ खेळावे हा संदेश हसत खेळत मुलांपर्यंत पोहोचवण्यात आला.

### जामखेडमधील सभेत आ. थोरात यांची टीका

# भाजपा सत्तेत असेपर्यंत राज्यघटनेला धोका

**समाचार/जामखेड-दि.३०**

भाजपच्या केंद्रातील सत्तेला अहंकार आला होता दोन राज्याच्या मुख्यमंत्र्यांना अटक केली दहशत, भ्रष्टाचार व जातीपातीचे राजकारण यामुळे लोकसभा निवडणुकीत भाजपचा अहंकार वाढला होता. महाराष्ट्रातील जनतेने या अहंकाराला मुठमाती देऊन इतिहास घडवला. दोन अडीच वर्षांपूर्वी भाजपने शिवसेना व राष्ट्वादी पक्षात तोडफोड करून राज्यात सत्तेवर आले. या सरकारने भ्रष्टाचाराचा कळस गाठला, कायदा मोडून खाल्ला, मंत्रालय हे भ्रष्टाचाराचे केंद्रबिंदू झाले आहे. जोपर्यंत भाजप सरकार आहे तोपर्यंत राज्यघटनेला धोका आहे अशी टीका माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सोमवारी जाहीर सभेत केली. कर्जत जामखेड




विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार रोहित पवार यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला यानंतर भव्य रॅली काढून जाहीर सभा घेण्यात आली यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात बोलत होते. यावेळी खासदार निलेश लंके, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण दादा गायकवाड, आमदार नारायण पाटील आदी उपस्थित होते. खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, कर्जत जामखेची जनता दोन आमदार निवडणार आहेत. एक विधानपरिषदेवर आहेत त्यांचे आणखी साडेचार वर्षे बाकी आहेत. जर दोन आमदार पाहिजे असेल तर आ. रोहीत पवार यांना निवडून द्या. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे व रोहित पवार मंत्री होणार आहे. पाच वर्षांत ईडी, सीबीआय, पर्यावरण यांच्या चौकशीमुळे यांनी वयापेक्षा जास्त अनुभव असणारे व तावून सुलाखून निघालेले कोहिनूर हिरा झाले आहेत.

# कार्तिक व आर्यन यांची महाराष्ट्र संघात निवड





**समाचार/नगर-दि.३०**

नुकत्याच नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय वुषू स्पर्धेमध्ये ॲक्टिव्ह स्पोर्ट्स अँड मार्शल आर्ट अकॅडमीचा कार्तिक महादेव निक्रड याने १७ वयोगटात ८० ते ८५ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले. तर आर्यन सचिन पर्वते यानेही १९ वयोगटात ५२ ते ५६ किलो वजन गटात सुवर्णपदक मिळविले आहे. कार्तिक व आर्यन या दोघांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. कार्तिक हा मांडवे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन महादेव निक्रड यांचा सुपूत्र आहे. जम्मू काश्मीर येथे राष्ट्रीय स्पर्धा होणार आहेत. कार्तिक आणि आर्यन हे दोघे श्री रामकृष्ण शाळेत गेल्या चार वर्षापासून सराव करत आहेत. कार्तिक याने मागील वर्षी राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये रौप्यपदक मिळवले होते. त्यांना मुख्य प्रशिक्षक दीपक धनवटे, सारडा कॉलेजचे क्रीडा शिक्षक संजय साठे, शुभम सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. आमदार संग्राम जगताप, सारडा कॉलेजच्या मुख्याध्यापिका भोसले, नगर जिल्हा वुषू संघटनेचे सचिव लक्ष्मण उदमले, संजय धोपावकर, माजी नगरसेवक नितीन शेलार यांनी या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे. कार्तिक आणि आर्यन यास मांडवे ग्रामस्थांनी जम्मू काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## बालभवनातील विद्यार्थ्यांसाठी आर्टस् ॲण्ड क्राफ्ट कार्यक्रम

**समाचार/नगर-दि.३०**

स्नेहालय संचलित बालभवनातील विद्यार्थ्यांसाठी आर्ट्स ॲण्ड क्राफ्ट कार्यक्रम घेण्यात आला. बालभवनाविषयी माहिती बालभवन प्रकल्प व्यवस्थापिका उषा खोल्लम यांनी दिली. त्यांनी शैक्षणिक आणि भावनिक विकासाच्या दृष्टीने कलात्मक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यशाळा: ग्रीटिंग कार्ड्स आणि आकाश कंदील बनविणे.वैशाली बर्डे मॅडम यांनी मुलांना ग्रीटिंग कार्ड्स आणि आकाश कंदील तयार करण्याच्या विविध पद्धतीविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि त्यांच्या सृजनशीलतेला वाव दिला. उत्कृष्टतेचा गौरवकार्यक्रमाच्या शेवटी, उत्कृष्ट ग्रीटिंग कार्ड्स आणि आकाश कंदील तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

## निवास नाईक यांचा अपक्ष अर्ज दाखल

**समाचार/श्रीगोंदा-दि.३०**



नगर विधानसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी संघटना माजी उपाध्यक्ष निवास नाईक यांनी मंगळवारी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडी कडून ते इच्छुक होते राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यात घेतलेल्या मुलाखती मध्ये त्यांनी मुलाखत दिली होती. जागा वाटपात शिवसेनेला जागा सुटल्याने नाईक यांनी २४ ऑक्टोंबर रोजी मराठा आरक्षण लढाई चे नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन उमेदवारीची मागणी केली होती जरांगे पाटील यांनी निवास नाईक यांना उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सांगितले त्यानुसार नाईक यांनी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला अशी माहिती निवास नाईक यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.



### बागरोजा हडको, दातरंगे मळा; जाधव मळा येथे प्रचार रॅली

# विकास कामांमुळे नागरिकांचा विश्वास संपादन केला-आ. जगताप

**समाचार/नगर-दि.३०**

नागरिकांच्या सहकार्यातून विकास कामांची मुहूर्तमेढ उभी केली असून सतत जनतेच्या संपर्कात राहून प्रश्न सोडविण्याचे काम केले असल्यामुळे ऋणानुबंध निर्माण झाले. जनतेचे माझ्यावर असलेले प्रेम पाहून मन भारावून गेलो, शहरात गेल्या दहा वर्षात केलेल्या विकास कामातून नागरिकांचा विश्वास संपादन केला, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ आमदार संग्राम जगताप यांनी जाधव मळा, सरोदे कॉलनी, हडको, दातरंगे मळा, परिसरातील नागरिकांची विकास यात्रेच्या माध्यमातून संवाद साधला यावेळी माजी नगरसेवक दगडू पवार, प्रा. अरविंद शिंदे, युवराज शिंदे, गणेश दातरंगे, हरिभाऊ येलदंडी, काका शेळके, वैभव वाघ, शुभम दातरंगे, दादा पांडुळे, भरत जाधव, योगेश जाधव, सनी जाधव, राजू कोकणे, सनी आगरकर, शरद दातरंगे आदी उपस्थित होते.

### वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी कार्यकर्त्यांचा निर्णय

# भगवान बाबा मंदिरात आता कॅमेऱ्याची नजर

**समाचार/नगर-दि.३०**

निर्मल नगर येथील भगवान बाबा मंदिर, हनुमान मंदिरात दिवसा चोर्याय झाल्या. यामधे पितळी घंटा, दिव्याच्या समई, दानपेटी चोर्याचचे प्रमाण वाढले होते. सामाजिक कार्यकर्त्यांनी येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्या करिता पुढाकार घेतला. यामुळे भविष्यात होणार्याम चोर्या बंद होतील. या भावनेने कार्यकर्त्यांनी चांगले काम केले. सीसीटीव्ही मुळे चोर पकडण्यासाठी पोलिसांना चांगली मदत होते. या सीसीटीव्ही कॅमेर्या मुळे गुन्हेगारीला आळा बसेल. असे प्रतिपादन जेष्ठ नागरिक सिताराम पालवे यांनी केले.

सावेडी उपनगरात निर्मल नगर येथे भगवान बाबा मंदिरात सामाजिक कार्यकर्तेव भगवान बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री.भीमराज आव्हाड, राहुल सांगळे, भाऊसाहेब जावळे या कार्यकर्त्यांनी स्वखर्चाने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला त्याचा शुभारंभ सिताराम पालवे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावेळी अनिल आंधळे, नामदेव कांबळे, गोकुळ काळे, विठ्ठल खेडकर,संभाजी आव्हाड, प्रकाश लगड, अंबादास दहिफळे, कचरू आंधळे, संजय शिरसाठ,पप्पू गीते, संदीप ढाकणे, मोहन आव्हाड, विष्णू सुपेकर, अण्णा शिरसाठ,रमेश गायकवाड, लक्ष्मण दहिफळे, जगन्नाथ जावळे, बापू कांबळे, ज्ञानदेव चेमटे, बापू भावसार परिसरातील नागरिक उपस्थित होते. भगवान बाबा व हनुमान मंदिर मधील मोठमोठ्या समई, पितळी घंटा, दानपेट्या आदींच्या चोर्यात वाढल्या होत्या. त्यामुळे नागरिकांसह भाविकांनी याबाबत चिंता व्यक्त केली.

जर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले तर चोर्याय होणार नाहीत या उद्देशाने मागणी केली. त्याची त्वरित दखल घेऊन मी व माझे सहकारी श्री.राहुल सांगळे श्री.भाऊसाहेब जावळे आम्ही तिघांनी लगेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला व त्याचा शुभारंभ जेष्ठ नागरिकांच्या हस्ते केला. आता यामुळे तरी चोर्यांचे सत्र कमी होईल.२ दिवसात हे सर्व काम पूर्ण होईल.असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. भीमराज आव्हाड यांनी सांगितले.

# युवक - युवतींनी केला मतदानाचा हक्क बजावण्याचा संकल्प

**समाचार/नगर-दि.३०**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वलभूमीवर जिल्हा प्रशासन, जिल्हा निवडणुक विभाग यांच्या निर्देशानूसार नेहरु युवा केंद्र, जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा ग्रंथालय कार्यालय, डॉ. ना.ज. पाऊलबुध्दे विद्यालय, श्री नवनाथ युवा मंडळ, स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व साई श्रध्दा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जागृती अभियान राबविण्यात आले.






वसंत टेकडी येथील डॉ. ना.ज. पाऊलबुध्दे विद्यालयातील शालेय विद्यार्थ्यांना कुटुंबातील सदस्यांना कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदानाचा हक्क बजावण्याचा आग्रह धरण्याची शपथ देण्यात आली. तर महाविद्यालयीन युवक–युवतींनी मतदानाचा हक्क बजावण्याचा संकल्प केला.

यावेळी पाऊलबुध्दे विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.एस. बिडवे, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, साई श्रध्दा फाऊंडेशनच्या अध्यक्षा अर्चना परकाळे, युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, प्रा. आशा गावडे, प्रा. रोहिदास चौरे, विनायक सापा, दिपक परदेशी, वैशाली शिर्के, लक्ष्मी चौरे, सुजाता दरे, अर्चना यंगळदास, वैशाली बूचकुळ, रावसाहेब पाखरे, प्रतिभा डोंगरे–खोडदे, सायंबर आदी उपस्थित होते.

नाना डोंगरे, मुख्याध्यापक बिडवे यांची भाषणे झाली. या उपक्रमासाठी नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला, उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणुक अधिकारी राहुल पाटील, प्र. जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिघे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अशोक गाडेकर, शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, लेखापाल सिध्दार्थ चव्हाण, रमेश गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.



सावेडी येथील चंदुकाका ज्वेल्स येथे धनत्रयोदशीचा मुहूर्त साधून ग्राहकांनी सुवर्ण खरेदीसाठी मोठी गर्दी केली. (छाया : निर्मल ॲडव्हर्टायझिंग)

# स्केटिंग ॲकॅडमीच्या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन



**समाचार/नगर-दि.३०**

जिल्हा क्रीडा संकुल वाडियापार्क येथे अहिल्यानगर जिल्हा रोल बॉल संघटना व टीम टॉपर स्केटिंग अकॅडमी च्या वतीने आयोजित मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून याचे उद्घाटन शगुन ज्वेलर्सचे संचालक सुनील डहाळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी टेनिस बॉल क्रिकेट संघटना अध्यक्ष प्रविण गायकवाड, प्रशिक्षक टेनिस बॉल क्रिकेट संघटना अविनाश काळे, संचालक अरुणोदय क्रीडा प्रशिक्षण संस्था महेश आनंदकर, तसेच महेश बागल, विशाल साळवे, ॲड. गौरव डहाळे यांच्या प्रमुख उपसथितीत पार पडले, या वेळी १०० हुन अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

रोल बॉल संघटना अध्यक्ष प्रदीप पाटोळे यांनी प्रशिक्षण शिबीराचे वैशिष्ट सांगितले, खेळाडूंना या प्रशिक्षण शिबिरातील खेळाडूंना भेटणारा लाभ सर्वांगीण विकास रोल बॉल तसेच स्केटिंग खेळातील उणीवा, गैरसमज अशा अनेक महत्वपूर्ण बाबींची माहित सचिव प्रशांत पाटोळे यांनी दिली, सूत्र संचालन व मान्यवरांचे स्वागत प्रदीप पाटोळे यांनी केले व मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय रोल बॉल खेळाडू जागृती बागल, रूद्र निकम, पारस निकम, राष्ट्रीय स्केटिंग खेळाडू कार्तिक नन्नवरे, इशशिका वघुळूकर, साद शेख यांचा सत्कार केला तसेच अमोल ठोंबे अक्षय चौधरी, पियुष कदम, शारोन लाजरस, अदित्य सोनवणे, श्रीकांत कसाब, स्वप्नील साठे यांनी आयोजन कामी सहकार्य केले. सचिव प्रशांत पाटोळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.


## पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी
शोरूमकरिता
टॅली ऑपरेटर व सेल्सगर्ल पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : सोनचाफा, कापड बाजार, कोहिनूर साडीसमोर, एम. जी. रोड, अहमदनगर
मोबाईल नं. : +91 93563 52421

## बंगला विकणे आहे
१६८० प्लॉट एरिया २१०० स्क्वे. फूट बांधकाम असलेला बंगला विकणे आहे. (पूर्व मुखी)
पत्ता : 'तथास्तु', श्रेयसनगर, साईनगरजवळ (गुंडू गोडाऊन मागे), बुऱ्हानगर ग्रामपंचायत हद्दीत तपोवन रोड, अहिल्यानगर
* संपर्क *
9921182783
9921631424

## CHANGE IN NAME
MY OLD NAME WAS **SUVALAL JETHMAL SHINGAVI.** MY NEW NAME IS **SUWALAL JETHMAL SHINGAVI.** IT WILL BE USED FOR ALL FUTURE PUPROSES .

## प्लॉटस् विकणे
केडगाव (देवीचे) च्या मागील ६० फुटी रोडवरील ५०० बंगल्याजवळील स. नं. २०२/२/१ मधील, साधारण २ गुंठ्यांचे काही प्लॉटस् योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
9422227944

## पाहिजेत
निर्मलनगर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अ.नगर
यशोदानगर, भारतीय स्टेट बँकेजवळ, पाईपलाईन रोड, अ.नगर
✻ पद – व्यवस्थापक । ✻ पदसंख्या – १
✻ शिक्षण – बी. कॉम, एम.कॉम
✻ अनुभव – पतसंस्थेत वरील पदावर काम केल्याचा अनुभव

## SASE DCORATERS

Mandap, Light & Flower Decoraters
Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar
9822331006, 9579544110

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक – २५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२४



| | |
|---|---|
| VENOM THE LAST DANCE हिंदी (3D) | 10.00 AM 12.30 PM 03.00 PM 05.00 PM 08.00 PM 10.20 PM |
| कर्मयोगी आबासाहेब | 05.00 PM |
| विकी विद्या का वो वाला व्हिडिओ | 08.15 AM 02.00 PM 10.30 PM |
| फुलवंती | 12.00 PM 05.00 PM |
| VETTAIYAN हिंदी | 11.00AM 07.15 PM |
| जिगरा | 09.00 AM 02.30 PM 10.15 PM |
| राजा राणी | 08.00 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book my show
CONNPLEX
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्ल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी
डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अ. नगर
७५८८११५११७/ ९८२२०८१४४०


## जाहीर नोटीस

घ. नं. १७८–ए पार्ट/भिंगार/२०२४–२५
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक : २२/१०/२०२४

या नोटिसीद्वारे जाहीर करण्यात येते की, नसीर अब्दुल रहेमान उर्फ बाबामियाँ शेख, धंदा : मजुरी, राहणार १७८/अ, मोमीनपुरा, भिंगार, अहमदनगर यांनी घर नं. १७८–ए पार्ट, भिंगार, सर्व्हे नं. २११/४३–ए पार्ट, भिंगार, अहमदनगर छावनी परिषद हे रजिस्टर खरेदीखत क्र. ५१३ दि. ०३/१०/१९९२ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क, हितसंबंध असेल वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत सबळ कागदपत्रांच्या पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहमदनगर यांच्याकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**घर नं. १७८–ए पार्ट, भिंगार**
**क्षेत्रफळ : २४१.०० चौ. फू.**
**(४३७.५०० चौ. फूट पैकी)**

**सौ. एस. एम. पारनाईक**
कार्यालय अधीक्षक
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
**(विक्रांत मोरे)**




UNITED PHARMA
Sargical & Generic Medicine
UNITED PHARMA
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
90 49 93 44 44
79 72 37 80 81
98 22 02 06 49






प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144

२१ वर्षाची पर्यटन परंपरा
KESARI
चैतन्य पब्लिसिटी
ट्रॅव्हल्स् व इन्शुरन्स
संचालक – पत्रकार किशोर मरकड
- ऑनलाईन एअर व रेल्वे तिकेट
- देश-विदेशातील हॉटेल बुकींग
- पासपोर्ट व व्हिसा मार्ग/धार्मिक टूर बुकींग
- सर्व न्यूज पेपर व चॅनल ॲडव्हर्टायझिंग
- देश-विदेशातील टुर्स बुकींग.
- केसरी टूर्सचे बुकींग
- स्वतंत्र सहलींचे आयोजन.

रेनबो हाऊस, सावेडी रोड,अ.नगर.
9422222431, 7350553131

आपल्या उज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा
व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या..
वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...


SS 304 L टँक
उत्तम दर्जाचे PUF इन्शुलेशन
60 LS 5000 LPD
उपलब्ध प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध
V-GUARD Solar Water Heater
देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर
– अधिकृत विक्रेते –
प्रोप्रा. मिलिंद गंधे
आदित्य एन्टरप्रायजेस्
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर.
9325103781


सुख आणि समृध्दी घेवूनी आगमन व्हावे लक्ष्मीचे
दिव्यांच्या प्रकाशात उजळावं भविष्य उद्याचे...
बँकेचे भागधारक, खातेदार,ठेवीदार व हितचिंतक सर्वांना
दीपावली व नूतनवर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

सुनिल पुराणिक – मुख्य कार्यकारी अधिकारी
अमित मुथा – व्हा. चेअरमन
हस्तीमल मुनोत – चेअरमन

संचालक मंडळ
अनिल पोखरणा, कमलेश भंडारी, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, संजय चोपडा, किशोर मुनोत, संजीव गांधी, श्रीमती प्रमिलाबाई बोरा, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, सुभाष बायड
जितेंद्र बोरा (कर्मचारी प्रतिनिधी) ✻ प्रसाद गांधी (कर्मचारी प्रतिनिधी) ✻ नितीन भंडारी (जॉ. मुख्य कार्यकारी अधिकारी)
बोर्ड ऑफ मॅनेजमेंट – संजीव गांधी (चेअरमन), राजेश झंवर, पेमराज बोथरा, सीए प्रवीण कटारिया
व सर्व कर्मचारी वृंद

अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि.
मर्चन्टस् बँक जेथे.. लक्ष्मी वास करी तेथे...
प्रधान कार्यालय : प्लॉट नं. ३३, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहिल्यानगर. फोन : ०२४१ –२३२२२२२

कर्जावरील आकर्षक व्याजदर

| | |
|---|---|
| स्वामिनी गृह कर्ज योजना | व्याजदर 6.50 %* |
| गृहनिर्माण कर्ज | गृहनिर्माण विस्तार – व्याजदर 7%* |
| टॉप-अप गृहनिर्माण कर्ज | व्याजदर 8%* |
| मालमत्तेवरील कर्ज | (किरकोळ तारण/व्यवसाय कर्ज)- व्याजदर 11.00%* |
| सोनेतारण कर्ज - | व्याजदर 8.00%* |

* नियम व अटी लागू.

ठेवीवरील आकर्षक व्याजदर
3 वर्षापेक्षा जास्त ते 5 वर्षापर्यंत 7.30% व्याजदर
ज्येष्ठ नागरिक 7.80%
सहकारी संस्था 7.30%
15 लाख व त्यापेक्षा जास्त मुदतठेवींना 0.25% जास्त व्याजदर

शाखा : अ.नगर– दाळमंडई । मार्केट यार्ड । कापडबाजार । गुलमोहर रोड । चितळे रोड । एम.आय.डी.सी । तारकपुर जामखेड ।छ.संभाजीनगर। पुणे । श्रीगोंदा । शेवगाव । पाथर्डी । सोनई । घोडनदी । कडा ।छ.संभाजीनगर (मोंढा)। नारायणगाव